मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ७९ ✦ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ सप्टेंबर २००९

वेबसाईट : www.marathepratishthan.org ई-मेल : maratheparivar@yahoo.co.in

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे. (फक्त खाजगी वितरणासाठी)

## जाहीर निमंत्रण

**मराठे प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा**

रविवार दि. २५ ऑक्टोबर २००९ला सायंकाळी ५ वा. दामले योग केंद्र, मनमाला टॅक रोड, माटुंगा (प), मुंबई-४०००१६ येथे आयोजित केली आहे. सर्वांनी अुपस्थित राहावे, हे आग्रहाचे निमंत्रण.

◎◎◎◎◎

मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखेचा तिसावा वर्धापनदिन व २०१०ची दैनंदिनी प्रकाशन समारंभ शुक्रवार दि.२५ डिसेंबर २००९ ला सायंकाळी ४ वा. गांधर्व महाविद्यालय सभागृह, ४१५ शनिवार पेठ, मेहुणपुरा, जोशी बंधू मंगल कार्यालयाजवळ, वर्तक आश्रमाशेजारी, पुणे-४११०३० येते आयोजित केला आहे. तरी आपण सहकुटुंब सहपरिवार अवश्य अुपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, ही विनंती.

## संपादकीय



प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा सप्रेम नमस्कार.

'हितगुज' जून २००९च्या अंकात अुपाध्यक्षांनी हितगुजची वाढीव वर्गणी द्यावी. म्हणून आवाहन केले होते. मीही 'संपादकीय' मधे आजीवन वर्गणी ११०० रु. वाढविली आहे. ती पाठवावी म्हणून विनंती केली होती. सांगायला आनंद होतो की आमच्या या आवाहनाला चांगला प्रतिसाद कुलबांधवांनी ११००रु. वर्गणी त्वरित पाठवून दिला. ज्या कुलबांधवांनी हे सहकार्य केले त्या सर्वांचे अभिनंदन आणि धन्यवाद. ज्यांनी ज्यांनी 'हितगुज'ची वाढीव वर्गणी भरली त्या सर्वांची नावे या अंकात प्रसिद्ध केली आहेत. (पृ. ९ पाहा.)

आपला असा चांगला प्रतिसाद मिळाल्यामुळे आता 'हितगुज'चे आयुष्य वाढले आहे हे निश्चित. आपणा सर्वांना 'हितगुज' प्रकाशित व्हावा असे वाटते आहे हे यावरून पुन्हा अेकदा सिद्ध झाले आहे. त्यामुळे 'हितगुज' दिमाखात चालू राहील असा विश्वास वाटत आहे. 'हितगुज' आपले सर्वांचे आहे त्याला बळ देणे आपले कर्तव्य आहे. आणि कुलबांधवांनी वाढविलेली वर्गणी देऊन कर्तव्याचे पालन केले आहे. याचे मला विशेष महत्त्व वाटते. असो.

या अंकाचे वैशिष्ट्य म्हणजे या अंकात वार्षिक अहवाल, आय:व्यय हिशेबपत्रक-ताळेबंद दिला आहे. हा दि. २५ ऑक्टोबरला अंध्याकाळी ५ वाजता दामले योग केंद्रात वार्षिक सर्वसाधारण सभा व गुणवत्ता पारितोषिके देण्याचा कार्यक्रम आहे. मराठे परिवारातील हुषार, गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी आपण सर्वांनी आवर्जून येणे आवश्यक आहे. तसेच मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखेचा वर्धापन दिन व दैनंदिनी प्रकाशन २५ डिसेंबरला आहे. दोन्ही कार्यक्रमांना जास्त संख्येने या भेटी-गाठींमुळे आत्मीयतेचे, प्रेमाचे नाते वाढते.

'हितगुज' विषयी आपली मते, आपला अभिप्राय तसेच काही सूचना असल्यास अवश्य कळवाव्यात म्हणजे काही सुधारणा हव्या असल्यास त्याचा विचार केला जाईल.

आपली शुभचिंतक,<br>
डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे<br>
(पृ. १२०)<br>
संपादिका - हितगुज<br>
दि. २३ ऑगस्ट २००९

◎ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे : ८/१३, सहकार नगर, वडाळा (पू.), मुंबई-४०००३१ ◎

दूरध्वनी : २४१५०८८९ ◆ ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com

◆ अक्षरजुळणी : सौ.सुप्रिया रेडकर (लक्ष्मी ग्राफिक्स), दादर ◆

# अंबाजोगाई दर्शन यात्रा

सोबत परळी वैजनाथ

प्रत्येक शुक्रवार किंवा शनिवार निघते

सहल खर्च रुपये २६००/-रेल्वे ३एसी तिकीटासहीत

रुपये १७००/-रेल्वे स्लीपरक्लास तिकीटासहीत

नवरात्र निमित्त

# साडेतीन शक्तिपीठ यात्रा

सप्तश्रृंगी-वणी, रेणुका-माहूर, भवानी-तुळजापूर, महालक्ष्मी-कोल्हापूर
सोबत नांदेड-गुरुद्वारा, परळी वैजनाथ, अंबाजोगाई

**८ ते ११ऑक्टोबर सहल खर्च रु.५८००/-**

रेल्वे ३एसी प्रवास

---

*blue lagoon*

# अंदमान

**7 nights – 8 days** चैन्नईला वास्तव्य नाही

Direct Mumbai-Port Blair & Port Blair-Mumbai by Air

**Tour cost : Rs/-16.660/-only**

Package include Air fare extra

Double bedded AC room, Airport Transfers & Sightseeing
as per the itinerary by private Non AC car, tea/coffee/breakfast/lunch & dinner

## 10 to 17 November

आपले आवडते कलाकार
श्री.शरद पोंक्षे यांचा या सहलीत सहभाग



---

नवी कोरी करकरीत आजपर्यंत न पाहिलेली न ऐकलेली टूर

कोस्टल कर्नाटकातील

# अष्टविनायक दर्शन

दर महिन्याच्या चौथ्या शनिवार/रविवार
शुक्रवारी संध्याकाळी निघून सोमवार पहाटे परत

**सहल खर्च रुपये ३५००/ फक्त**

यासहल खर्चात दुसरावर्ग रेल्वे तिकीट
चहा-नाष्टा-दोनवेळचे जेवण
व हॉटेल वास्तव्य इत्यादी
खर्च समाविष्ट आहे.

अधिक माहिती व बुकिंग साठी संपर्क

ग्रुप बुकिंग केल्यास १० ते २५ % सवलत देण्यात येईल

आयोजक : राजेश रानडे

**92232 73496**

**TOURWAYS**

C-305 Palm Acres.M.P.Rd, Mulund east Mumbai 81

---

७ दिवस/७ रात्र

EXCLUSIVE

# कोस्टल कर्नाटक


नॉर्थ कॅनरा ते साऊथ कॅनरा ( कारवार ते उडपी )

नॉर्थ कॅनरा : सदाशीवगड, कारवार, अंकोला, कुमठा, होनावर, येलापूर, सिरसी, बनवासी

साऊथ कॅनरा : कोल्लूर, मरवंथे, कुंदापूर, अन्नेगुडडी, उडपी, श्रृंगेरी, होरनाडु, धर्मस्थळ, कटील,

मागोड व जोग फॉल कापू व मलपे बीच

**सहल खर्च रुपये ७४५०/-** रेल्वे प्रवास भाडे अधिक





११ सप्टेंबर/२२ ऑक्टोबर/२७ नोव्हेंबर

०८ ऑक्टोबर फक्त महिलांसाठी

# समाजसेवा - एक व्रत

लेखिका सौ.शामला पुरंदरे (जाईल)

चंदनाचं खोड सहाणेवर घासल्यावर त्याच्या अंगच्या नैसर्गिक सुवासाने परिसर दरवळू लागतो व झिजण्यातून शीतल गंध निर्माण होतो. ज्यामुळे जीवनातील दाहकता कमी होते. मनुष्याच्या जीवनात जेव्हा असं घडतं, तेव्हा तो समाजकार्य करतो असं म्हणतात.

विचारवंत लोकांनी मानवाची अशी व्याख्या केली आहे की जो सद्‌गुणी होऊन सद्‌गुण जागृत करतो, दुसऱ्याच्या सुखाने सुखी होतो, दु:खाने त्याचे अंत:करण विरघळते अन् स्वत: ज्ञान प्राप्ती करून घेऊन दुसऱ्यास ज्ञान देतो. असा योग्य मनुजच पावित्र्य, समता, विनम्रता, बंधुता, सहकार्य, जीवननिष्ठा कर्मशक्ती आणि परिश्रमशीलता अशा विविध विलक्षण गुणांनी समाजाचं हित करतो. मी म्हणजे एक अति सामान्य व्यक्ति जी प्रथम प्रपंच सांभाळून सहवासात येणाऱ्याशी मैत्रीचे धागे विणणारी, आपण समाजाचा एक घटक आहोत ही भावना अंत:करणाच्या गाभ्यात सतत जागृत ठेवून समाजाचं ऋण फेडण्याची इच्छा ठेवणारी! मग लोकहितासाठी आयुष्य वेचणाऱ्या आदर्शाची ओढ लागते व अवतीभवती नजर टाकली की कळतं, 'अरे, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे आपणही थोड्याफार प्रमाणात समाजसेवा करु शकतो.'

आमच्या शेजारी बांधकाम सुरू आहे. तिथे समीर व सनी ही दोन गोड मुले वाळूत खेळत असतात. माझी शेजारीण हरिणी अय्यंगार नित्यनियमाने त्यांना नाश्ता खाऊ घालते. देणाऱ्या व घेणाऱ्या दोघांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत असतो. अशाच कोवळ्या मनांवर सुसंस्कार घडावेत म्हणून माझी मैत्रिण बागेश्री पटाईत लहानग्यांकडून मनाचे श्लोक, प्रार्थना पाठ करून घेते. आमच्या सोसायटीमधील वृंदावन बाग आखली, रचली, आयोजिली व फुलविली श्री. बोराडेकाका यानी ते देखील कसलीच अपेक्षा न बाळगता. या सर्वांकडून मी महत्वाची गोष्ट शिकले म्हणजे दुसऱ्यासाठी काही केलं तर त्या गोष्टीची अजिबात वाच्यता करायची नाही. देशासाठी प्राणाची आहूती देणारे क्रांतीकारक स्वातंत्र्यवीर सावरकर गरजत:

'धैर्यशील सामर्थ्याने चढू कठीण घाट
कास धरु विज्ञानाची शोधू नवी वाट'

हे अनुसरून नोकरीत असताना व आता निवृत्त झाल्यावर विद्यार्थ्यांना innovative science projects बनविण्यासाठी नवनवीन कल्पना सुचविते. Cleanliness is next to Goliness या उक्तीप्रमाणे मन व घर स्वच्छ ठेवण्याचा मन:पूर्वक प्रयत्न करते. मनाला आलेल्या मरगळीला झटकून टाकण्यासाठी आशाताई बिंदुमाधव जोशी यांच्या 'स्वाध्याय'ला जाते तर घरकुल बागेतील रंगीबेरंगी फुलांनी सजविते. ओला आणि सुका कचरा वेगळा करते. घरामागे गांडूळ खतासाठी खड्डा खणला आहे. स्टेट बँक नगरमधील कुसुमताई पत्की यानी ऋतुराज ग्रंथालय सुरू केलंय. हे ठिकाण म्हणजे मांगल्याची मंदाकिनी, संस्काराची सरस्वती व ज्ञानाची गंगा. वाचनीय पुस्तके ग्रंथालयाच्या सुपूर्त करते.

आपल्याकडे विवाह समारंभात अक्षता खूप वाया जातात. मी स्वत: अशा जपून ठेवलेल्या अक्षताच्या रुपाने एकदा कामवालीला ३ किलो तांदूळ दिले. वेगवेगळ्या निमित्ताने कपडे, खेळणी, भांडी व खाऊ गरजू लोकांना दिल्यावर समाधान मिळतं. नानासाहेब परुळेकर ट्रस्टच्यावतीने दिले जाणारे स्टिकर्स रिक्षावाल्या काकाना देते. कोणी थुंकताना पाहिल्यावर गांधीगिरी स्टाईलने त्यांना तसं न करण्याबद्दल विनविते. झाडं तोडताना पाहिल्यावर 'तसं करू नका' म्हणून सांगते. मी म्हणजे राष्ट्र व राष्ट्र म्हणजे मी अशा भावनेने वीज, पाणी इत्यादी संपत्तीचा अपव्यय होणार नाही याबद्दल सदैव दक्ष राहून दुसऱ्यांना त्याबाबत काळजी घेण्यासाठी प्रयत्न करते. आपल्या देशात दारिद्र्यामुळे कित्येक कोवळ्या कळ्या उमलण्याआधीच कुस्करून, कोमेजून जातात. अशाना कुवतीप्रमाणे आर्थिक मदत केल्यामुळे खारूताईचा वाटा अुचलण्याची तृप्तता मिळते. तुकडोजी महाराज सांगत त्याप्रमाणे ज्या कार्यात मनुष्याचे अंतरंग ओतलेले असते ते कार्य टिकाऊ, सुंदर, अमर असते. याचा ठायीठायी प्रत्यय येतो. समाजाने दूर लोटलेल्या कुष्ठरोग्यांना व्यथांचा विसर पाडून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या आमटे या कुटुंबाच्या चार पिढ्या वंदनीय वाटतात. डॉ. राणी व डॉ. अभय बंग यानी आदिवासी लोकात परमेश्वर पाहिला. चिपको चळवळीचे प्रवर्तक सुंदरलाल बहुगुणा यांचे समाजकार्य जसं अतुलनीय आहे. तद्वत् बिल गेटस् यांच देखिल! बिल क्लिंटन यांच्या 'Giving' या पुस्तकातून दुसऱ्यासाठी काही न काहीतरी छान कार्य करणाऱ्या असंख्य लोकांची ओळख होते. ही सर्व उदाहरणं पाहिल्यावर नजरेसमोर उभा राहतो. उंच आकाशात दिलखुलास हसणारा, मनाला मोहविणारा, नक्षीदार रंगीत आकाशदिवा. तो हळूच सांगतो, 'आपल्याही जीवनात माणसानं उंचीवर जावं पण खालील मातीशी इमान ठेवावं कारण जिथे गर्व संपतो तिथेच प्रतिष्ठा सुरू होते.'

आमच्या पंचवटी ज्येष्ठ नागरिक संघाच्या सुनंदाताई पांढरकर नर्मदा परीभ्रमण करून आल्या. अहिल्याबाई होळकरांच्या समाजकार्यासंबंधी त्यांनी जी माहिती दिली ती ऐकून अंगावर रोमांच उभे राहिले. सासरे मल्हारराव यांनी त्यांना सती न जाता परमेश्वराने जी कामगिरी सोपविली आहे. ती पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहन दिले म्हणून बाईंनी घाट बांधले, देवळं उभारली, धर्मशाळा बांधल्या व प्रजेला सुखी ठेवलं.

आपल्या समाजवृक्षाला भ्रष्टाचार, अज्ञान, अंधश्रद्धा, लोकसंख्या, गरिबी इत्यादि अनेक प्रकारची कीड लागलीय. तेव्हा ती संपूर्णपणे नष्ट करून सत् आचारविचाराचे खत घालून हा समाजवृक्ष चांगला बहरु दे हीच खरी तळमळ!

संध्येचं तांबडं पसरतय्. दूरवरून मिताली

*(पृष्ठ ४ वर)*

# BUSH IN PRIMARY SCHOOL

- Compiled by Ramakant Vidwans (Pg.623)

GEORGE BUSH GOES TO A PRIMARY SCHOOL TO TALK ABOUT THE WAR. AFTER HIS TALK HE OFFERS QUESTION TIME.ONE LITTLE BOY PUTS UP HIS HAND AND GEORGE ASKS HIM WHAT IS YOUR NAME IS.

"BOB".

AND WHAT IS YOUR QUESTION, BOB? I HAVE 3 QUESTIONS.

FIRST,WHY DID THE USA INVADE IRAQ WITHOUT THE SUPPORT OF THE UN?
SECOND,WHY ARE YOU PRESIDENT WHEN AL GORE GOT MORE VOTES? AND
THIRD,WHAT HAPPEND TO OSAMA BIN LADEN?

JUST THEN THE BELL RINGS FOR RECESS.

GEORGE BUSH INFORMS THE KIDDIES THAT THEY WILL CONTINUE AFTER RECESS.

WHEN THEY RESUME GEORGE SAY,OK WHERE WERE WE?
OH THAT'S RIGHT..........QUESTION TIME.

WHO HAS A QUESTION?

A DIFFERENT LITTLE BOY PUTS UP HIS HAND.
GEORGE POINTS HIM OUT AND ASKS HIM WHAT HIS NAME IS?

"STEVE"

AND WHAT IS YOUR QUESTION STEVE?

I HAVE 5 QUESTIONS.

FIRST,WHY DID THE USA INVADE IRAQ WITHOUT THE SUPPORT OF UN?
SECOND,WHY ARE YOU PRESIDENT WHEN AL GORE GOT MORE VOTES?
THIRD,WHAT HAPPENED TO OSAMA BIN LADEN?
FOURTH,WHY DID THE RECESS BELL GO 20 MINUTES EARLY?
AND FIFTH, WHERE IS "BOB" ?

⦿⦿⦿⦿⦿

**THIS IS IMPORTANT AND USEFUL.................**

WHEN A THIEF FORCES YOU TO TAKE MONEY FROM THE ATM, DO NOT ARGUE OR
RESIST, YOU MIGHT NOT KNOW WHAT HE OR SHE MIGHT DO TO YOU. WHAT YOU
SHOULD DO IS TO PUNCH YOUR PIN IN THE REVERSE, I..E IF YOUR PIN IS 1254, YOU PUNCH 4521.

THE MOMENT YOU PUNCH IN THE REVERSE, THE MONEY WILL COME OUT BUT WILL
BE STUCK INTO THE MACHINE HALF WAY OUT AND IT WILL ALERT THE POLICE
WITHOUT THE NOTICE OF THE THIEF.
EVERY ATM HAS IT; IT IS SPECIALLY MADE TO SIGNIFY DANGER AND H ELP.
NOT EVERYONE IS AWARE OF THIS.

*(पृष्ठ ३ वरून)*

## समाजसेवा - एक व्रत

भौमिकचे स्वर ऐकू येत आहेत :

‘मोको कहाँ ढूँढे रे बंदे,
मैं हूँ न मंदिर, मस्जिद में,
ना काशी कैलाश में,
ना जपतपमें, ना व्रत उपवास में,
मैं तो हूँ तेरे विश्वास में’

संत कबीर, तुकाराम, ज्ञानोबा या सर्वांच्या म्हणण्यानुसार निराधारांना आधार देणं, दोन शब्द प्रेमानं बोलणं, दुसऱ्यांना त्रास न देता जमेल तशी मदत करणं हीच खरी समाजसेवा आहे. सूर्य होता नाही आलं तरी पणती होऊन अंधारात चाचपडणाऱ्याला मदतीचा हात पुढे केला तरी जीवन सार्थकी लागेल.

वडोदरा (चंद्रपूर) येथील प्रा. मधुकर उपलेंचवार हे कित्येक वर्षे सहकाऱ्यांसमवेत गरजू, निष्ठावान, गरीब विद्यार्थ्यांसाठी अहोरात्र झटत आहेत. त्यांचेच शब्द आठवतात :

‘सूर्याचे नवतेज घेऊनी, नव सूर्यांना घडवावे,
प्रकाशपूजक बनूनी आपण, चराचराला उजळावे.’

हेच खरं समाजकार्य आहे जे प्रत्येकाला करता येईल, मला, आपल्याला व सर्वांना!!

लेखिका : श्यामला पुरंदरे (जाईल)
२७ब, वृंदावन सोसायटी, पंचवटी,
पाषाण, पुणे - ४११००८.
दूरध्वनी - (०२०)२५८९८५३४
मोबाईल- ९४२२५२१७२४

◆◆◆

## साभारपोच

श्रीविद्यारण्याविरचित श्रीशङ्कर दिग्विजय मूळसंस्कृत श्लोकांसहित मराठी अनुवाद - लेखक श्री. ज.गो. मराठे.

१. प्रकाशक - सानिका प्रकाशन
२. प्रथमावृत्ती जुलै २००९
३. किंमत : रुपये ५००/- फक्त
४. श्री. गुणेश मराठे, ३०४ ॲ. रिद्धि सिद्धी अपार्टमेंट पद्मणनगर, आगाशी- ४०१३०१.

संपर्क दूरध्वनी - ०२५०/२५८८६९५.

# मराठे प्रतिष्ठान दैनंदिनी २०१०चे निवेदन

मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेने २००६ सालापासून दैनंदिनी काढण्यास सुरुवात केली आहे. यंदा डायरीचे पाचवे वर्ष आहे. आम्ही पहिली ३ वर्ष डायरी ४०० पानांची काढली होती. त्यात शनिवार व रविवार साठीही स्वतंत्र पाने होती व उपयुक्त अशा विविध विषयांवरील लेखांचा अंतर्भाव केलेला होता. परंतु २००९ची डायरी मात्र निम्म्या पानांचीच काढली होती. त्यामुळे एका पानावर दोन तारखा घेतल्या होत्या. अशी छोटी डायरी वापरायला व बरोबर बाळगायला सुटसुटीत वाटते अशी अनेक बांधवांची प्रतिक्रिया असल्यामुळे यंदाही २०१०ची डायरी २०० पानांचीच काढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यंदाही २०१०च्या डायरीत एका पानावर दोन तारखा असतील याची कृपया नोंद घ्यावी. त्याबरोबरच काही उपयुक्त विषयांचे लेखही या डायरीत दिले जातील. त्याचा आपल्याला निश्चितपणे उपयोग होईल याची खात्री वाटते.

कागदाचे, प्रिंटींगचे रेट वाढलेले असले तरी दरवर्षी प्रमाणे यंदाही पृष्ठदानासाठी १०० रु.च निश्चित केले आहे. उद्देश एकच की जास्तीत जास्त कुलबांधवांनी या उपक्रमात सहभागी होऊन आम्हाला सहकार्य करावे. त्यामुळे आपला स्वत:चा, बायको, मुले, बहिण, भाऊ, आई, वडील, भाचे, पुतणे यांचे वाढदिवस किंवा लग्नाचे वाढदिवस किंवा कोणाच्या स्मृतिप्रित्यर्थ तारखा कळवून आपण पृष्ठदान करू शकाल. आत्तापर्यंत प्रत्येक वर्षी किंवा कोणत्याही डायरीत पृष्ठदान केलेले असेल त्यांनी यंदाही अवश्य पृष्ठदान करावे. आपला जर स्वतंत्र व्यवसाय असेल तर डायरीमधे जाहिरातही द्यावी ही विनंती.

**जाहिरातीचे दर पुढील प्रमाणे आहेत.**

| | |
|---|---|
| १. डायरीचे रंगीत मलपृष्ठ | ७०००रु. |
| २. मलपृष्ठाचे आतील रंगीत पान | ६०००रु. |
| ३. रंगीत पूर्ण पान | ५०००रु. |
| ४. काळेपांढरे पूर्ण पान | ३०००रु. |
| ५. काळेपांढरे अर्धे पान | १५००रु. |
| ६. काळेपांढरे पाव पान | ५००रु. |
| ७. शुभेच्छा पट्टी | ३००रु. |

बरेच कुलबांधव आम्ही डायरी लिहीत नाही असे सांगतात. आपण जरी रोज डायरी लिहीत नसाल तरी पत्ते, फोन नंबर, निरोप, महत्त्वाच्या नोंदी, वधूवरांची स्थळे, किराणामालाची यादी यासारख्या कितीतरी कामांसाठी आपण डायरीचा उपयोग करू शकाल. १०० रु. देणे हे कोणत्याही मध्यमवर्गीयांनासुद्धा अशक्य नाही. तरी जास्तीत जास्त कुलबांधवांनी व माहेरवाशीणींनी आपली पृष्ठदाने व जाहिराती लवकरात लवकर पाठवाव्या हि विनंती.

डायरी काढण्याचा मुख्य उद्देश म्हणजे जास्तीत जास्त कुलबांधवांशी संपर्क वाढावा आणि मराठे प्रतिष्ठानची स्वत:ची वास्तू असावी हा आहे. डायरीतून जे पैसे मिळतील ते इमारत निधीमध्ये जमा केले जातात. त्यामुळे समजा आपल्याला पृष्ठदान करण्याची किंवा जाहिरात देण्याची इच्छा नसेल तर इमारत निधीसाठी आपण देणगीही पाठवू शकता.

आपल्या संपर्कातल्या ज्या कुलबांधवांकडे हितगुज जात नसेल त्यांनाही आपण वरील माहिती द्यावी ही नम्र विनंती. पृष्ठदान व जाहिरात फक्त मराठ्यांनीच दिली पाहिजे असे नाही. मराठ्यांव्यतिरिक्तही पृष्ठदान व जाहिराती स्विकारल्या जातील. पृष्ठदाते व जाहिरातदार यांना २५ डिसेंबरला डायरीचा प्रकाशन समारंभ झाल्यानंतर डायरी लगेच मिळू शकतील.

तरी डायरीचा हा उपक्रम राबवण्यासाठी आपण आम्हाला जास्तीत जास्त सहकार्य करावे ही नम्र विनंती.

**संपर्क व पत्रव्यवहारासाठी पत्ता -**

**१. सौ. नीलांबरी रमेश मराठे**
व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र, ६४२ नारायण पेठ, प्राथमिक नूमवि समोर अप्पा बळवंत चौक, पुणे-४११०३०. फोन-(ऑफीस) २४४५६२७०, (घर) ६५२००६९८.

२. श्री. अरुण दत्तात्रय मराठे
१७५९ सदाशिव पेठ, भिकारदास मारुती जवळ, पुणे - ४११०३०. फोन - २४४७३२८१.

**विशेष वार्ता -** २५ डिसेंबरला डायरीच्या प्रकाशन समारंभासाठी उपस्थित राहण्यासाठी **खूषखबर** कार्यक्रमाच्या सुरवातीला आयत्या वेळची सामान्य ज्ञान स्पर्धा घेतली जाणार आहे. वयाची अट नाही. ही स्पर्धा अर्धा तास असून त्यात वस्तुनिष्ठ स्वरुपाचे १०० प्रश्न असतील. अधिक माहिती डिसेंबरच्या अंकात वाचू शकाल. ज्यांना भाग घ्यायची इच्छा आहे त्यांनी मला किंवा श्री. गजानन चिंतामणी मराठे यांना कळवावे ही विनंती. (फोन - २४५३१६५१) सौ. निलांबरी मराठे

१.४.२००९ नंतर जे सदस्य हितगुजचे नविन मेंबर झालेले आहेत त्यांचे नाव व पत्ते पुढीलप्रमाणे.

१. **श्री. विजय इंदुशेखर विद्वांस**
पावती दि. १३.४.२००९
सुरभि हाईटस्, डी विंग, फ्लॅट नं. २१.
पहिला मजला, वारजे जकात नाका,
पुणे ४११०५२.
पावती क्रमांक २३६०. आजीव सभासद
१०० व हितगुज २००.

२. **श्रीमती मंजुळा माधव लिमये**
पावती दि. ३.५.२००९
सिद्धीविनायक नगरी, यमुना ई.
फ्लॅट नं. ६, अप्पूघरच्या पाठीमागे,
निगडी पुणे.
पावती क्रमांक २३६१ आजीव सभासद
१०० व हितगुज २००
वडील - श्री. रघुवीर हरी मराठे - दुर्ग - कर्नाटक.

३. **श्री. चंद्रशेखर जयंत विद्वांस**
पावती दि. ३१.५.२००९
५५२ शनिवार पेठ, श्री. ना.दा. ठा.
कन्याशाळेसमोर, करमरकर वाडा,
पुणे - ४११०३०.
पावती क्रमांक २३६३. आजीव सभासद.
१०० व हितगुज २००.

हितगुज २००९ जूनच्या अंकातील आवाहनानुसार हितगुज राखीव फंड निधी दिलेले सदस्य पुढीलप्रमाणे -

१. **सौ. स्वाती सुरेश मराठे १००० रु.**
पावती क्र. २३६४ दि. २८.६.०९

२. **श्री. श्रीनिवास गोपाळ मराठे**
१०००रु.
पावती क्र. २३६६ दि. ९.७.०९

३. **श्री. विजय भालचंद्र मराठे**
**१०००रु.**
पावती क्र. २३६७ दि. १५.७.०९

४. **श्री. अरुण दत्तात्रय मराठे**
**१००० रु.**
पावती क्र.२३६८ दि. १६.७.०९

५. **सौ. नीलांबरी रमेश मराठे**
**१००० रु.**
पावती क्र. २३६९दि. १६.७.०९

६. **श्री. कमलाकर अनंत जाईल**
५००रु.
पावती क्र. २३७० दि. ६.८.२००९

७. **श्रीमती शुभदा शंकर मराठे**
**१०००रु.**
पावती क्र.२३७२ दि. ८.८.२००९

◆◆◆

## वंदना मराठे (पृ.२७७), ठाणे
## अेका कर्तबगार महिलेची यशोगाथा

य.वि. मराठे प्रा. लि. ५०-५२ वर्षांपासूनची सोन्याचांदीची पेढी व वास्तूरचनाकार नातू-परांजपे बिल्डर या दोन्ही प्रतिष्ठित नावांची वलये असलेल्या मराठ्यांच्या सुनेची म्हणजे सौ. वंदना विश्वास मराठे यांची जिद्दी, कल्पक नाविन्यपूर्ण यशोगाथा आपणा सर्वच महिलांसाठी प्रेरणादायी ठरावी.

सतत काहीतरी वेगळं करत राहणं, समाजाचं ऋण फेडत राहणं, सुबत्ता असूनही स्वत:तील सुप्तगुणांना खतपाणी घालून स्वत:च निराळं अस्तित्व सिद्ध करणं ही सोपी गोष्ट नाही. एखाद्या स्त्रीने गरज म्हणून काम करण्यापेक्षा अर्थार्जन हा हेतू नसताना आंतरिक उर्मीशी प्रामाणिक राहण्यासाठी प्रयत्नशील राहण्यातच फार मोठी कसोटी आहे.

वंदनाताईच्या माहेरी सर्वजण हिंगणेस्त्री शिक्षण संस्थेच्या मदतीसाठी भाऊबीज फंड गोळा करत असत. त्यांच्या वयाच्या दहाव्या वर्षांपासूनच त्यांनी यात हातभार लावण्यास सुरुवात केली. म्हणजे तेव्हाच हे समाजसेवेचे बीज पेरले गेले. पुढे लग्नानंतर मराठ्यांकडेसुद्धा असंच पुरक वातावरण असल्याने सर्वांना पाठिंबाच मिळाला. मात्र जे काही करशील त्यातील एक पै सुद्धा आपल्या घरात येता कामा नये या सासरे मामा मराठे यांच्या अटीचे सुरुवातीपासूनच पालन केल्याने त्यांनी एक वेगळेच विश्व निर्माण केले.

दोन्ही मुली दुसऱ्यांनी सांभाळण्याइतपत मोठ्या झाल्यानंतर सुरुवातीची किमान पाच वर्षे तरी त्यांनी कुष्ठरोग्यांसाठी खुद्द त्या कॉलनीत जाऊन काम केले. तेथे स्वयंसेविकाची नवीन फळी तयार करून मग कागदी, कापडी फुले व इतर कलाकृती बायकांना शिकवून अकबरअलीज् सारख्या मोठ्या दुकानातून त्या वस्तू विक्रीस ठेवून त्यांना उत्पन्न मिळवून दिले. इतरही गरजूंना भरतकामाच्या पेंटिंगच्या साड्या, रेक्झिनच्या बॅगा इ. वस्तू करवून प्रदर्शनात मार्केट मिळवून दिले. टेलिफोन क्लिनिंग व ड्रायक्लिनिंग ह्याचे प्रात्यक्षिके देवून एक नव्या व्यवसायाची वाट दाखवली. हे सर्व करताना काळाची गरज ओळखून नोकरदार महिलांना उपयुक्त अशा केटरिंगची कल्पना त्यांना सुचली. आता जवळजवळ २५ वर्षे त्या या व्यवसायात स्थिरावल्या आहेत.

सुरुवातीच्या काळात घरच्या स्वयंपाकाचे कॉन्ट्रक्ट देण्याची कल्पना रुचणे सोपे नव्हते. तेव्हा अनेक अभिनव कल्पना राबवण्यात वंदनाताई यशस्वी ठरल्या. उदा. पुरणपोळीसाठी तयार पुरण व भिजवलेली कणीक द्यायची, बटाटेवड्यासाठी सारण द्यायचे नि कामावरून थकूनभागून घरी परतलेल्या स्त्रीने स्वत:च्या हाताने घरच्या खवय्यांची रसनातृप्ती करायची! तसेच हायट्रेकिंगच्या लोकांसाठी इन्स्टंट फुडस्ची पॅकेटस उदा. झटपट मूग खिचडी, उपमा, गोडा शिरा, पिठलं भात असेही गरजू महिलांकडून बनवून घेतले. बायको माहेरी गेल्यावर पुरुषांनाही उपयोगी पडणाऱ्या या पॅकेटसना वाढती मागणी नसती तरच नवल!

नंतर तयार ताजा पदार्थांची मागणी वाढल्यानंतर वंदनाताईंनी आपले कार्यक्षेत्र विस्तारले. त्यांच्या व्यवसायाचे वेगळेपण म्हणजे अगदी सुरुवातीपासूनच कमीतकमी ५ माणसांचे त्या कॉन्ट्रॅक्ट घेतात व कितीही छोटी ऑर्डर असली तरी प्रत्येक गरजू बाईला एकतरी पदार्थ, असे सर्व ऑर्डरीचे विभाजन करतात त्यात प्रत्येकीला रोज उत्पन्न व जास्त पदार्थ बनवण्याचा ताण न येता उत्तम पदार्थ असा दुहेरी हेतू असतो मग ताटातील प्रत्येक पदार्थाचे कौतुक तर होतेच पण लोकांनाही वंदनाताईवर पूर्ण भरवसा ठेवता येतो. उत्तम साहित्य, तसेच तेलसुद्धा परत तळणीसाठी न वापरणे त्याबद्दल कटाक्ष असतो. वंदनाताई स्वत: पदार्थ बनवत नसल्याने पदार्थ त्यांच्याकडे एक तास आधी येतात व चव बघूनच पुढे पाठवले जातात. एखादा पदार्थ त्यांनी रिजेक्ट केल्यास परत बनवण्यासही अवधी मिळतो. पण या धाकाने महिला आधीच उत्तम पदार्थ पाठवण्याचा पूर्ण प्रयत्न करतात. मग वेळेत व स्वच्छ भांड्यात पाठवला जातो. कारण प्रेझेंटेशन हे महत्त्वाचे.

आज त्यांची संस्था सहकार भगिनी उद्योग म्हणून नावारुपास झाली आहे. पण यातून मिळणाऱ्या उत्पन्नातली एक पै ही वंदनाताई घेत नाहीतच, तर त्या करणाऱ्या बायकांना जास्तीतजास्त फायदा मिळवून देतात. त्यातील थोडेफार टक्के बाजूला ठेवून कॅन्सर पेशंटस्, बाळंतीणी, मुंजमुले, लग्न इ. साठी पाठवतात. याप्रमाणे सोशलवर्कर म्हणून त्या अजूनही त्याच जोमाने कार्यरत आहेत. आपल्यात पहिलं बाळंतपण माहेरी करण्याची पद्धत आहे. मेडिकलप्रमाणे हाही मोठा खर्च असतो. पण ३-३ मुली असल्यावर ते परवडत नाही. अशा गरजू महिलांना त्या वैयक्तिक मदत करतात. कुठल्याही संस्थेला मदत करण्यापेक्षा ते जास्त आवश्यक आहे. हल्ली सर्वच महिला बाहेर कामाला जाऊ लागल्या आहेत. हॉटेल्स आहेतच, पण रोज-रोज हॉटेलचं पोटाला अन् खिशाला परवडतंच असं नाही. अशा वेळी स्वच्छ हायजेनीक घरगुती तरीही हॉटेल स्टाईल पदार्थ मिळाले तर का नाही सहकार भगिनी उद्योगाला फोन करून ऑर्डर द्या म्हणणार? हल्लीच्या युगात प्रत्येक गोष्टीत एक्सपर्टस्ची आवश्यकता असते. म्हणून 'स्टार माझा' चॅनेलच्या खमंग ह्या रेसीपी शो मध्ये हल्ली १।। वर्षे त्या एक्सपर्ट कमेंट्स देण्यासाठी शनिवार रविवार आपल्याला टिव्ही वर दिसतात. ह्या आधी मी मराठीवर त्या रोज एक रेसीपी स्वत: करून दाखवत असत. त्यांच्या केटरींग मधला किंवा सोशलवर्कचा भाग वगळता अभिनय व वक्तृत्व कला मुळातच अंगी असल्याने त्या मनोरंजन विश्वातही सातत्याने स्टेजवर असतात.

◆◆◆

### साहित्यासाठी आवाहन

अपत्यप्राप्ती, जन्म-मृत्यु, परिक्षेतील यश, कला-क्रीडा - सामाजिकसेवा, समाजकार्यातील प्रगती, पदोन्नती, विवाह, परदेशगमन इ. आपल्या कुटुंबातील महत्त्वाच्या घटनांची माहिती 'हितगुज' मधे प्रसिद्धीसाठी पाठवावी. तसेच कथा, कविता, निबंध, ललित, वैचारिक साहित्य, विनोद, पाककृती, सुविचार इत्यादि साहित्य पाठवावे ही विनंती.

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ**

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे. म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

शुक्रवार दि. १९ जून २००९ला दुपारी ४ वा. मराठे प्रतिष्ठानची बैठक मराठे अुद्योग भवन, प्रभादेवी येथे झाली. कार्यवाह श्री. हेमंत मराठे, (नालासोपारा) यांनी मागील इतिवृत्त वाचून दाखविले ते सर्वसमंत झाले. प्रतिष्ठानकडे आलेल्या पत्रव्यवहाराचे वाचन झाले. नालासोपारा येथील योगिनी मराठे यांचे दीर श्री. जयवंत मराठे आजारी असून त्यांचे ऑपरेशन करायचे आहे. त्यासाठी त्यांनी प्रतिष्ठानकडे वैद्यकीय मदत मिळावी म्हणून अर्ज केला होता. तेव्हा ५००० रु. वैद्यकीय मदत देण्याचे ठरले. 'हितगुज' अंका विषयी चर्चा झाली. 'निर्माण' ग्रुपचे संस्थापक श्री. अजितकुमार मराठे यांनी 'अुद्योजक पुरस्कार' द्यावा म्हणून २१,००० रु. ची ठेव मराठे प्रतिष्ठानला दिली. ठाणे येथील श्री. सुरेश मराठे हिशेब पावती पाठविणे यासाठी मदत करणार असल्याचे ठरले. 'हितगुज'चे भूतपूर्व संपादक श्री. लक्ष्मणरावांनी त्यांची नात प्रथम श्रेणीत बीएस्सी झाल्याबद्दल पेढे वाटले. पुढील मिटींग १७ जुलैला आपले कुलबांधव श्री. विनायक विद्वांस यांनी आग्रहाने बोलाविल्यामुळे त्यांच्या घरी घेण्याचे ठरले. चहापाना नंतर सभा संपली.

शुक्रवारी दि. १७ जुलै संध्याकाळी ४ वा. मराठे प्रतिष्ठानची बैठक सौ. रोहिणीवहिनी व विनायक विद्वांस, अभेद सोसायटी, चारकोप, कांदिवली येथील निवासस्थानी भरली. श्री. हेमंत मराठे (नालासोपारा) कार्यवाह यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले. मराठे प्रतिष्ठान द्वारा गुणवत्ता पारितोषिके दिली जातात, बक्षिस घेणारा यशस्वी विद्यार्थी किंवा त्याचे पालक हे प्रतिष्ठानचे आजीव सभासद असणे आवश्यक आहे का? गुणवत्ताधारक विद्यार्थी हा प्रतिष्ठानचा मेंबर असणे ही बंधनकारक आहे का यावर चर्चा झाली. तशी अट नाही. त्याचप्रमाणे मराठ्यांच्या माहेरवाशिणीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या पिढीतील नातवांना गुणवत्ता पारितोषिके देणे नियमात बसते का यावर साधकबाधक चर्चा झाली. सारांश असा की मराठे परिवारातील कोणाही गुणवत्तालायक विद्यार्थ्याला तो किंवा त्याचे पालक जरी मराठे प्रतिष्ठानचे आजीवन सभासद नसले तरी पारितोषिक दिले जाते. परंतु नंतर त्याच्या वडिलांनी मराठा प्रतिष्ठानचे सदस्य व्हावे म्हणजे त्यांचे नाते मराठे प्रतिष्ठानशी जोडले जाईल. माहेरवाशिणीच्या दुसऱ्या पिढीत घराणे बदलते आडनाव बदलते त्यामुळे नातवाला मराठे प्रतिष्ठानचे बक्षिस देण्याचा प्रश्नच नाही. अध्यक्षांनी आय-व्यय ताळेबंद कधी पूर्ण होणार हे कोषाध्यक्षांना विचारून त्यांनी वेळ काढून लवकरात लवकर ३१ ऑगस्टपर्यंत पूर्ण करतो असे सांगितले. त्यानंतर २५ ऑक्टोबरला, मराठे प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा, दामले योग केंद्रात (मनमाला टँक रोड, लोकमान्य नगर हॉलजवळ, माटुंगा रोड (प.रे.) सायंकाळी ५ वा. घेण्याचे निश्चित करण्यात आले. या सभेत कार्यवाह श्री. मोहनराव मराठे, खार (पृ. ३६५) यांना 'जीवनगौरव' पुरस्कार घोषित झाला. म्हणून सर्वांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले. श्री. विनायक विद्वांस (पृ.६२३) यांनी मराठे परिवार ९वे संमेलन, दुर्ग-कारकल तालुका (कर्नाटक) येथील फोटो काढून त्यांची सुंदर सी.डी. तयार केली. ते छान फोटो त्यांच्या घरी दूरदर्शनवर दाखविले. जे संमेलनाला अुपस्थित राहू शकले नाहीत त्यांना फोटो पाहायला मिळाले, आणि जे संमेलनाला गेले, कोस्टल कर्नाटक, सहल केली त्यांना फोटो पाहून पुन:प्रत्ययाचा आनंद झाला. अुपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांनी त्यांची पत्नी सौ. शुभा यांचा वाढदिवस होता म्हणून पेढे वाटले. सर्वांनी शुभाताईंना त्यांच्या सत्तराव्या वाढदिवसाबद्दल शुभेच्छा दिल्या. पुढील बैठक दि. १५ ऑगस्टला श्री. रमाकांत विद्वांस, माटुंगा यांच्या घरी घेण्याचे ठरले. सौ. रोहिणीवहिनींना मोठ्या मेहनतीने केलेल्या सुग्रास अुकडीच्या मोदकांचा आस्वाद घेऊन, चहापानानंतर सभा संपली.

या बैठकीला सर्वश्री. श्री. आनंदराव मराठे, रमाकांत विद्वांस, सी.गो. खांबेटे, वा.ग. मराठे, लक्ष्मणराव मराठे, मोहनराव, हेमंत, प्रभाकर, डोंबिवलीचे सुरेश मराठे, ठाण्याचे सुरेश मराठे, डॉ.सौ. सुमेधा प्र. मराठे इत्यादी मंडळी अुपस्थित होती.

◎◎◎◎◎

**प्रतिष्ठान वृत्त**

मराठे प्रतिष्ठानची बैठक दि. १५ ऑगस्ट २००९ला दुपारी ४ वा. अुपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांच्या निवासस्थानी झाली. सभेला अध्यक्ष श्री. आनंदराव, वि.के. लक्ष्मणराव, मोहनराव, हेमंत, प्रभाकर, डॉ.सौ. सुमेधा, वा.ग. सौ. वृषाली वामन मराठे शुभाताई व श्री. रमाकांत विद्वांस, विश्वस्त श्रीमती सुलभाताई इत्यादि मंडळी अुपस्थित होती. कार्यवाहाने सभेचे मागील इतिवृत्त वाचून दाखविले.

या बैठकीत विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोषाध्यक्ष श्री. प्रभाकर मराठे, चार्टड अकौंटंट यांनी २७वा वार्षिक अहवाल व हिशेबपत्रके आय-व्यय ताळेबंद सभेपुढे सादर केले. अेकमताने ते अध्यक्षांनी मंजूर केले. पुढील सभा दि. १२ सप्टेंबरला दुपारी ४ वाजता मराठे उद्योग भवनात (प्रभादेवी) घेण्याचे ठरले. १५ ऑगस्ट हा राष्ट्रीय सण असल्याने अध्यक्ष श्री. आनंदराव यांनी खास साजूक तूपातली जिलेबी आणली होती.

◆◆◆

●◎●◎

*मूर्खस्य पञ्च चिन्हानि गर्वी दुर्वचनी तथा।*
*हठी चाप्रियवादी च परोक्तं नैव मन्यते।।*

गर्वाने फुगून जाणे, इतरांस टाकून बोलणे, आपलाच हेका धरून बसणे, कटू भाषण करणे आणि दुसरा काय बोलतो ते न ऐकणे ही मूर्खांची पांच लक्षणे होत.

●◎●◎

ॐ

# मराठे प्रतिष्ठान

सार्वजनिक विश्वस्त नोंदणी क्र.७९१८ (मुं.) दि. १२.१.८१.
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५.
दूरध्वनी : २४३०२४५३; फॅक्स: ९१-२२-२४३७ ९८६३
e-mail:maratheparivar@yahoo.co.in

२७ वा वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके
१ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २००९

## वार्षिक सर्वसाधारण सभा :

रविवार दि. २५ ऑक्टोबर २००९ सायंकाळी ५.०० वा.

**सभास्थान :**

दामले योगकेंद्र सभागृह, मनमाला टँक रोड, लोकमान्यनगर हॉलजवळ, माटुंगा रोड (प.रे.), मुंबई ४०० ०१६

### विश्वस्त मंडळ

| | | | दूरध्वनी | वास्तव्य | कुवृप्र |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. आनंद यशवंत मराठे | विश्वस्त-कार्याध्यक्ष | २५४२ ५५२४ | ठाणे - प. | २७७ |
| २. | श्री. अरविंद दामोदर मराठे | विश्वस्त | ९५२५१ २४७०६७७ | डोंबिवली-पू. | २९२ |
| ३. | डॉ. राजेंद्र विठ्ठल मराठे | विश्वस्त | २५४२ १८९१ | ठाणे - प. | २९१ |
| ४. | श्री. सतीश काशिनाथ मराठे | विश्वस्त | २४४५ ८६४६ | दादर - प. मुंबई | १२९ |
| ५. | श्रीम. सुलभा सुरेश मराठे | विश्वस्त | २४४४ ३०७४ | माहिम, मुंबई | ३९९ |

### कार्यकारी मंडळ

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. आनंद यशवंत मराठे | विश्वस्त-कार्याध्यक्ष | २५४२ ५५२४ | ठाणे-प. | २७७ |
| २. | श्री. रमाकांत माधव विद्वांस | सभासद | २४३० ५२६० | माहिम, मुंबई | ६२३ |
| ३. | श्री. मोहन सदाशिव मराठे | सभासद | २६४६ ४३५१ | खारा-प, मुंबई | ३६५ |
| ४. | श्री. हेमंत अरुण मराठे | सहकार्यवाह | ९५२५० २४३३०३८ | नालासोपारा | ०२१ |
| ५. | श्री. प्रभाकर दामोदर मराठे | कोषाध्यक्ष | २४१५ ०८८९ | वडाळा, मुंबई | १२० |
| ६. | श्री. विनायक केशव मराठे | कार्यवाह | २४३० ३३२९ | वरळी, मुंबई | ०२० |
| ७. | श्री. लक्ष्मण शंकर मराठे | सभासद | २५६८ ०१०४ | मुलुंड-पूर्व, मुंबई | ५२० |
| ८. | श्री. सीताराम गोपाळ खांबेटे | सभासद | २६८३ ६९९४ | अंधेरी-पूर्व, मुंबई | ६७६ |
| ९. | श्री. प्रमोद कृष्ण मराठे | सभासद | २५४७ ७५११ | ठाणे | ६७६ |
| १०. | श्री. चिंतामण महादेव मराठे | सभासद | २४१५ ५३९० | परळ, मुंबई | २२२ |
| ११. | सौ. अदिती यशवंत मराठे | सभासद | २४४४ ९२७४ | माहिम, मुंबई | ३९९ |
| १२. | सौ. वर्षा शरद मराठे | सभासद | २८४१ ६७८७ | गोरेगाव | ०२१ |
| १३. | सौ. सुमेधा प्रभाकर मराठे | सभासद | २४१५ ०८८९ | वडाळा, मुंबई | १२० |
| १४. | श्री. अरुण दत्तात्रय मराठे (पुणे) | सभासद | ९५२० २४४७ ३२८९ | पुणे | ०६१ |
| १५. | श्री. अरविंद दामोदर मराठे | विश्वस्त-कायमनिमंत्रित | ९५२५१२४७०६७७ | डोंबिवली - पु. | २९२ |
| १६. | श्री. यशवंत सुरेश मराठे | कायम निमंत्रित | २४४४ ९२७४ | माहिम, मुंबई | ३९९ |
| १७. | श्री. वामन गणेश मराठे | कायम निमंत्रित | २८२६ ९४०२ | जोगेश्वरी-पू, मुंबई | ५०३ |
| १८. | श्री. सुरेश मराठे | सभासद-कायम निमंत्रित | ९५२५१ २४९ ४९५७ | डोंबिवली-पू, मुंबई | ५०३ |
| १९. | सौ. नीलांबरी रमेश मराठे | कायम निमंत्रित | ९५२० २४४५ ६२७० | पुणे, | २८० |

### बँकर्स

सारस्वत बँक, प्रभादेवी, मुंबई
युको बँक, टिळक रोड, पुणे

### लेखा-परीक्षक

श्री. चंद्रकांत वामन मराठे, ठाणे. (सनदी लेखापाल).

## मराठे प्रतिष्ठान

### वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना -

मराठे प्रतिष्ठानची सत्ताविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.२५-१०-२००९ रोजी सायंकाळी ५.०० वा. दामले योग केंद्र येथे आयोजित केली आहे.

**सभे पुढील कामे :**

१) दि. २५ ऑक्टोबर २००९ रोजी झालेल्या सव्विसाव्या वार्षिक सर्वसाधारणसभेचा वृत्तांत वाचून मंजूर करणे.
२) दि. ३१ मार्च २००९ रोजी संपलेल्या वर्षाचा मराठे प्रतिष्ठानचा अहवाल, ताळेबंद, व जमाखर्च संमत करणे.
३) सन २००९-१० च्या हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन निश्चित करणे.
४) सभासदांकडून आलेल्या पत्रांवर, प्रस्तावांवर, तसेच प्रतिष्ठानच्या भावी कार्यक्रमांवर विचार विनिमय करणे.
५) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या कामांचा विचार करणे.

कार्यकारी मंडळाच्या आदेशावरून.

श्री. मोहन सदाशिव मराठे
कार्यवाह

**२५ ऑक्टोबर २००९**

**टिपा -**

१) गणसंख्येच्या अभावी ही सभा तहकूब झाल्यास ती पुन्हा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाभरानंतर भरेल. त्याला गणसंख्येची पूर्ती आवश्यक नाही.
२) वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके सोबत दिली आहेत. काही खुलासा हवा असल्यास सभेच्या ७ दिवस अगोदर समक्ष किंवा पत्राने/ई मेलने विचारावा.
३) मराठे प्रतिष्ठानच्या कार्याबद्दल प्रस्ताव, ठराव, किंवा सूचना करावयाच्या असल्यास सभासदांनी त्या सभेच्या ७ दिवस अगोदर कार्यालयात किंवा ईमेलने पाठवाव्यात.
(e-mail:maratheparivar@yahoo.co.in)
४) सभेला येताना या अहवालाची प्रत आणावी.
५) सभेनंतर अल्पोपहाराची व्यवस्था आहे.

## मराठे प्रतिष्ठान

**सत्ताविसावा वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके**

(१ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २००९)

**सभासद बंधू भगिनींनो,**

मराठे प्रतिष्ठानच्या दि.३१ मार्च २००९ रोजी संपलेल्या वर्षाचा म्हणजेच २७वा वार्षिक अहवाल कार्यकारी मंडळ सादर करीत आहे.

### सभासद:

वृत्तांतसाली आजीव सदस्य संख्या (१३९३) २५ ने वाढून १४१८ झाली.

हितचिंतक संख्या (८) १ ने वाढून ९ झाली. आश्रयदाता संख्या (२०) १ ने वाढून २१ झाली. सन्माननीय सदस्य संख्या (३) कायम राहिली. या वर्षीच्या सर्व नवीन सदस्यांचे मराठे प्रतिष्ठान स्वागत करीत आहे.

'हितगुज'ची तहहयात वर्गणीदार संख्या (११००) २६ ने वाढून ११२६ झाली. मराठे प्रतिष्ठानच्या आजीव सदस्यत्वासाठी प्रत्येक सज्ञान स्त्रीपुरुष व्यक्तीने किमान रु.१००/- शुल्क पाठवावे व प्रत्येक कुटुंबासाठी कुटुंबप्रमुख सदस्याने रु.१०००/- 'हितगुज' तहहयात शुल्क आमचेकडे पाठवून मराठे प्रतिष्ठानला सहकार्य करावे.

**टिप -** आजीव सदस्यत्व त्या व्यक्तीच्या हयातीपर्यंतच असते. त्या व्यक्तीच्या निधनानंतर पुढील कुटुंबप्रमुखाने आजीव सदस्यत्व तसेच हितगुज तहहयात शुल्क भरावयाचे असते.

### वार्षिक सर्वसाधारण सभा -

मराठे प्रतिष्ठानची २६वी वार्षिक सर्वसाधारण सभा २८.१२.२००८ रोजी सायंकाळी ५.०० वा. दामले योग केंद्र सभागृह, माटुंगा (प.) मुंबई येथे भरली होती. गणपूर्ती संख्या अभावी सभा त्याच ठिकाणी ५.३० वा. संपन्न झाली.

सभेचे अध्यक्षस्थान मराठे प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. आनंद मराठे यांनी भूषविले. सभासदांची उपस्थिती समाधानकारक होती. यासभेत मागील सभेचे इतिवृत्त तसेच हिशेब पत्रके, ताळेबंद मंजूर करण्यात आला. त्यानंतर मराठे प्रतिष्ठानच्या मागील वर्षाच्या कार्याचा आढावा घेण्यात आला.

अहवाल सालातील काही नोंदी पुढीलप्रमाणे-

१. शनिवार दि.२७ सप्टेंबर, २००८ला, ठाणे येथील लक्ष्मीकेशव कार्यालयात, 'हितगुज' त्रैमासिकाच्या पंच्याहत्तराव्या अमृतमहोत्सवी अंकाचे प्रकाशन विख्यात नाटककार, साहित्यिक श्री.सुरेश खरे यांच्या हस्ते करण्यात आले.
२. गुरुवार दि.२५ डिसेंबर २००८ला, पुणे याथील गांधर्व महाविद्यालय सभागृहात मराठे प्रतिष्ठानचा २९वा वर्धापन दिन व दैनंदिनी प्रकाशन समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष श्री.मिलींद सुधाकर मराठे व त्यांचे सासरे प्रसिद्ध लेखक श्री.कृष्णाजी जनार्दन दिवेकर यांच्या मुलाखतींचा कार्यक्रम तसेच गाण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.
३. शनिवार दि.१४ मार्च २००९ला, सायंकाळी ५.३० वा. लक्ष्मीकेशव कार्यालय, ठाणे येथे मराठे प्रतिष्ठानचे संस्थापक कै.श्री.सुरेशभाऊ मराठे (पृ.३९९) यांचा स्मृतीदिन कार्यक्रम झाला.

सह्याद्रि वाहिनीचा 'हिरकणी' पुरस्कार प्राप्त डॉ.वसुधा आपटे (पृ.६२३ माहेरवाशिण विद्वांस) यांची मुलाखत डॉ.सौ. सुमेधा प्र. मराठे यांनी घेतली. तसेच व्यंगचित्रकार श्री.विकास सबनीस, 'व्हाया-वस्त्रहरण'चे लेखक श्री.गंगाराम गवाणकर यांच्या मुलाखती श्री.भाऊ मराठे यांनी घेतल्या.

हितगुज बाबतच्या माहितीचा आढावा संपादिका डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे यांनी घेतला.

वार्षिक अहवालामधील छपाईतील चुका श्री. प्रभाकर मराठे कोषाध्यक्ष यांनी सभेच्या संमतीने दुरुस्त केल्या. मराठे प्रतिष्ठान सदस्यांपैकी उपस्थित असलेल्यापैकी ज्यांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली अशा ज्येष्ठांचा सत्कार अध्यक्षांचे हस्ते साजरा केला गेला. उपस्थितांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्याचा कार्यक्रम पार पडला. मराठे प्रतिष्ठानचे सन्माननीय सभासद व जाहीरातदार श्री. अजित मराठे संचालक निर्माण ग्रुप यांचे हस्ते पारितोषिके देण्यात आली.

सभेपुढे इतर कोणतेही कामकाज नसल्याने माननीय अध्यक्षांच्या उपस्थितांचे आभार मानून सभा संपविण्यात आली.

◆◆◆

### 'हितगुज राखीव फंड निधी'

सर्वश्री. सुशीलकुमार के. मराठे, माजिवडा (ठाणे), कृष्ण रामचंद्र मराठे, माजिवडा (ठाणे), विश्वनाथ द. मराठे, मु. देऊळपाडा, पाळी, फोंडा-गोवा. श्रीमती लीला दत्तात्रेय मराठे, बोरिवली (पूर्व) गणेश मोरेश्वर खांबेटे, फणसवाडी, जगनाथ चाळ, मुंबई ४००००२, प्रकाश गणेश विद्वांस, मणीनगर, अहमदाबाद, अशोर मनोहर मराठे, दादर, मुंबई वसंत रामकृष्ण मराठे, विलेपार्ले, मुंबई, सौ. जयश्री जोशी, मीरारोड (जि.ठाणे) श्री. य.द. मराठे, औरंगाबाद, श्री.पी. अेम्. मराठे (आंबेजोगाई) श्री. अनंत विष्णू मराठे, ठाणे, श्री. वि.म. मराठे, सांगली. नरहरि गोविंद मराठे, मालाड. सौ. सुप्रिया सौरभ मराठे, डोंबिवली, हेमंत अरूण मराठे, नालासोपारा, संजय य. मराठे, वडोदरा (गुजराथ), श्री.सदानंद विष्णू मराठे (बांद्रा),

वि.म.मराठे, सुहास बळवंत मराठे, अरूण लक्ष्मण मराठे, भास्कर दत्तात्रय मराठे, आनंद अशोक मराठे, विद्याधर मुरलीधर मराठे, चिंतामणी गोपाळ मराठे, अमित अरूण मराठे, अरविंद नारायण मराठे (सर्व सांगलीचे सभासद)

श्री.अजितकुमार मराठे यांनी रू.२१,०००/- (अेकवीस हजार रू. ठेव म्हणून मराठे प्रतिष्ठानला दिले आहेत. त्याच्या व्याजातून अेका ठराविक रकमेचे पारितोषिक मराठे परिवारातील अुद्योजकाला दिले जाणार आहे.

श्रीमती लीला दत्तात्रेय मराठे, बोरीवली (पूर्व) यांनीही दहा हजार रूपये हितगुज राखीव फंडासाठी देणगी म्हणून दिले आहेत.

या देणगी दिलेल्या सर्व कुलबांधवांचे मराठे प्रतिष्ठान द्वारा आभार आणि धन्यवाद.

# THE BOMBAY PUBLIC TRUST ACT, 1950

**SCHEDULE VIII**

**[VIDE RULE 17(1)]** **REG.NO.E-7918 (BOM)**

**NAME OF THE PUBLIC TRUST MARATHE PRATISHTHAN**

**BALANCE SHEET AS AT ............ 31ST MARCH, 2009**

| FUNDS AND LIABILITIES | RS. | RS. |
|---|---|---|
| **KAYAM NIDHI** | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 182,595.00 | |
| ADD: LIFE MEMBERSHIP (MU) | 1,100.00 | |
| ADD: LIFE MEMBERSHIP (PU) | 1,400.00 | |
| ADD: HITCHNTAK (MU) | 500.00 | |
| ADD: ASHRAYDATA (MU) | 1,000.00 | 186,595.00 |
| **KULVRUTTANT NIDHI** | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 11,207.00 | |
| ADD: DONATION | 5,600.00 | |
| ADD: INTEREST | 897.00 | 17,704.00 |
| **SHIKSHAN NIDHI** | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 445,525.00 | |
| ADD: DONATIONS (MU) | 1,000.00 | |
| ADD: INTEREST | 35,642.00 | |
| LESS: TRANSFER TO I&E A/C | (3,400.00) | 478,767.00 |
| **SURESHBHAU SMRUTI NIDHI** | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 81,384.00 | |
| ADD: INTEREST | 6,510.00 | |
| LESS: EXPENSES | (16,175.00) | 71,719.00 |
| **UDYOG PRAVARTAN NIDHI** | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 50,535.00 | |
| ADD: INTEREST | 4,043.00 | 54,578.00 |
| **VISHISHTA HETU NIDHI** | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 144,697.00 | |
| ADD: INTEREST | 11,576.00 | 156,273.00 |
| **YUVA MANCH NIDHI** | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 1,337.00 | |
| ADD: INTEREST | 108 | 1,445.00 |
| **VAIDYAKIYA MADAT NIDHI** | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 26,778.00 | |
| ADD: DONATIONS (MU) | 5,000.00 | |
| ADD: DONATIONS (PU) | 11,001.00 | |
| ADD: INTEREST | 2,142.00 | 44,921.00 |
| **HITGUJ NIDHI** | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 283,505.00 | |
| ADD: DONATIONS (MU) | 42,753.00 | |
| ADD: SUBSCRIPTION (MU) | 2,500.00 | |
| ADD: SUBSCRIPTION (PU) | 2,700.00 | |
| ADD: INTEREST | 22,684.00 | |
| LESS: TRANSFER TO I&E A/C | (41,727.08) | 312,414.92 |
| **VINAY KHAMBETE SMRUTI YOJANA** | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 62,460.00 | |
| ADD: INTEREST | 4,997.00 | |
| LESS: TRANSFER TO I&E A/C | --- | 67,457.00 |
| **TOTAL C/F** | | **13,91,873.92** |

| PROPERTY AND ASSETS | RS. | RS. |
|---|---|---|
| **INVESTMENTS** | | |
| FIXED DEPOSITS WITH | | |
| SARASWAT CO-OP. BANK, WORLI | 428,144.00 | |
| COSMOS CO-OP. BANK, DADAR | 165,000.00 | |
| JANATA SAHAKARI BANK, DADAR | 182,542.00 | |
| JANAKALYAN SAH. BANK, DADAR | 75,000.00 | |
| JANAKALYAN SAH. BANK, SHIVAJI PARK | 110,000.00 | |
| JANAKALYAN SAH. BANK, SION | 258,479.30 | |
| UCO BANK, PUNE | 210,793.00 | |
| U.T.I. - C.R.T.S. | 59,000.00 | 1,488,958.30 |
| **INTEREST RECEIVABLE** | | |
| ON FIXED DEPOSITS WITH | | |
| JANAKALYAN SAH. BANK LTD., SION | 35,038.00 | |
| UCO BANK, PUNE | 37,119.00 | 72,157.00 |
| T.D.S. RECEIVABLE | | |
| FOR 1998-1999 | 2,262.00 | |
| FOR 1999-2000 | 4,968.00 | |
| FOR 2000-2001 | 2,188.00 | |
| FOR 2001-2002 | 2,296.00 | |
| FOR 2002-2003 | 2.002.00 | |
| FOR 2003-2004 | 696.00 | 14,412.00 |
| **CASH AND BANK BALANCE** | | |
| CASH ON HAND WITH | | |
| MUMBAI OFFICE | 9,649.00 | |
| PUNE BRANCH | 12,333.50 | 21,982.50 |
| **CASH AT BANK WITH** | | |
| SARASWAT BANK LTD. | 150,384.92 | |
| UCO BANK | 86,759.58 | 237,144.50 |
| LOAN TO RAVINDRA R. KHAMBETE | | 20,000.00 |
| LOAN TO PREETA KARMARKAR | | 10,000.00 |
| LOAN TO MOHAN MARATHE | | 10,000.00 |
| **TOTAL C/F** | | **18,74,654.30** |

| FUNDS AND LIABILITIES | RS. | RS. | PROPERTY AND ASSETS | RS. | RS. |
|---|---|---|---|---|---|
| **TOTAL B/F** | | **13,91,873.92** | **TOTAL B/F** | | **18,74,654.30** |
| **ANITA KHAMBETE SMRUTI YOJANA** | | | | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 13,263.00 | | | | |
| ADD: INTEREST | 1,061.00 | | | | |
| LESS: TRANSFER TO I&E A/C | (250.00) | 14,074.00 | | | |
| **GANESH TANTRIC SHIKSHAN YOJANA** | | | | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 20,537.00 | | | | |
| ADD: INTEREST | 1,643.00 | | | | |
| LESS: TRANSFER TO I&E A/C | --- | 22,180.00 | | | |
| **HINDI PATOSHIK YOJANA** | | | | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 1,349.00 | | | | |
| ADD: INTEREST | 108.00 | | | | |
| LESS: TRANSFER TO I&E A/C | (100.00) | 1,357.00 | | | |
| **YUVA MANCH NIDHI** | | | | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 1,244.00 | | | | |
| ADD: INTEREST | 93.00 | 1,337.00 | | | |
| **VAIDIK SHIKSHAN YOJANA** | | | | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 17,314.00 | | | | |
| ADD: INTEREST | 1,385.00 | 18,699.00 | | | |
| **SHOURYA PARITOSHIK YOJANA** | | | | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 2,913.00 | | | | |
| ADD: INTEREST | 233.00 | 3,146.00 | | | |
| **PUNE DAINANDINI YOJANA** | | | | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 82,567.00 | | | | |
| ADD: DONATIONS (PU) | 24,000.00 | | | | |
| ADD: INTEREST | 6,605.00 | 113,172.00 | | | |
| **VASTU PRAKALPA THEV** | | | | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 85,000.00 | | | | |
| ADD: ADDITION DURING THE YEAR | (85,000.00) | --- | | | |
| **BUILDING FUND (PUNE)** | | | | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 28,351.00 | | | | |
| ADD: DONATIONS | 10,903.00 | | | | |
| ADD: INTEREST | 2,268.00 | 41,522.00 | | | |
| **CURRENT LIABILITIES & PROVISIONS** | | | | | |
| AUDIT FEES | 750.00 | | | | |
| CONTRIBUTION TO CHARITY COMM. | 6,180.00 | 6,930.00 | | | |
| BAKSHIS ANAMAT | | 2,750.00 | | | |
| **INCOME AND EXPENDITURE ACCOUNT** | | | | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 229,215.73 | | | | |
| ADD: SURPLUS BEING EXCESS OF | | | | | |
| INCOME OVER EXPENDITURE | 29,734.65 | 258,950.38 | | | |
| **TOTAL** | | **1,874,654.30** | **TOTAL** | | **1,874,654.30** |

NOTE: THE HEADINGS AS PER THE PRESCRIBED FORM WHICH ARE ABSENT IN THE ABOVE STATEMENT SHOULD BE READ AS `NIL'

THE ABOVE BALANCE SHEET TO THE BEST OF MY BELIEF CONTAINS A TRUE ACCOUNT OF THE FUNDS AND LIABILITIES AND OF THE PROPERTY AND ASSETS OF THE TRUST

SUBJECT TO OUR REPORT OF EVEN DATE

**FOR MARATHE & ASSOCIATES**

Sd/-

CHARTERED ACCOUNTANTS

MEMBERSHIP NO.31107

**FOR MARATHE PRATISHTHAN**

| Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|
| PRESIDENT | SECRETARY | TREASURE |

MUMBAI: DATED NOVEMBER 03, 2009

## THE BOMBAY PUBLIC TRUST ACT, 1950

**SCHEDULE VIII**

**[VIDE RULE 17(1)]** **REG.NO.E-7918 (BOM)**

**NAME OF THE PUBLIC TRUST MARATHE PRATISHTHAN**

**INCOME & EXPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR ENDED: 31ST MARCH, 2009**

| FUNDS AND LIABILITIES | RS. | RS. | PROPERTY AND ASSETS | RS. | RS. |
|---|---|---|---|---|---|
| AUDIT | | 750.00 | BY INTEREST ON FIXED DEPOSITS | | 12,930.65 |
| | | | BY INTEREST ON SAVING BANK ACCOUNT | | |
| **TO EXPENDITURE ON THE OBJECT OF TRUST** | | | WITH SARASWAT CO-OP. BANK | 4,444.00 | |
| **MUMBAI MUKHYA KARYALAYA EXPENSES** | | | WITH UCO BANK PUNE | 1,506.00 | 5,950.00 |
| ANNUAL MEETING EXPENSES | 1,840.00 | | | | |
| POSTAGE & DISTRIBUTION (MU) | 366.00 | | BY TRANSFER FROM VARIOUS NIDHI & YOJANA | | |
| ANITA KHAMBETE SMRUTI PRIZES | 250.00 | | SHIKSHAN NIDHI (R) | 3,400.00 | |
| SCHOLARSHIP & PRIZES | 3,400.00 | | ANITA KHAMBETE SMRUTI YOJANA (R) | 250.00 | |
| HINDI PARITOSHIK | 100.00 | | HINDI PARITOSHIK YOJANA (R) | 100.00 | 3,750.00 |
| PRINTING & STATIONERY (MU) | 799.00 | | | | |
| KULVRUTTANT XEROX EXPENSES | 3,250.00 | | BY PUNE BRANCH INCOME | | |
| BANK CHARGES | 56.00 | 10,061.00 | VADHU VAR ACTIVITY (PU) | | 50.00 |
| | | | BY PUNE DAINANDINI INCCOME | | |
| **PUNE BRANCH EXPENSES** | | | ADVERTISEMENTS | 40,100.00 | |
| PRINTINT AND STATIONERY (PU) | 1,103.00 | | SALE OF DAINANDINI | 3,200.00 | 43,300.00 |
| MISCELLANEOUS EXPENSES (PU) | 695.00 | | | | |
| BANK CHARGES (PU) | 75.00 | | | | |
| POSTAGE & DISTRIBUTION (PU) | 195.00 | 2,068.00 | | | |
| **PUNE DAINANDINI EXPENSES** | | | | | |
| PRINTING, DISTRIBUTION, ETC. | | 24,567.00 | | | |
| HITGUJ PRAKASHAN EXPENSES | | | BY HITGUJ PRAKASHAN INCOME | | |
| HITGUJ PRINTING (MU) | 72,416.00 | | ADVERTISEMENTS | 59,601.00 | |
| HITGUJ POSTAGE (MU) | 26,492.00 | | TRANSFER FROM HITGUJ NIDHI | 41,727.08 | 101,328.08 |
| HITGUJ POSTAGE (PU) | 20.00 | | | | |
| HITGUJ MISCELLANEOUS (MU) | 1,200.00 | 100,128.08 | | | |
| INCOME & EXPENDITURE ACCOUNT | | | | | |
| SURPLUS BEING EXCESS OF INCOME OVER | | --- | | | |
| EXPENDITURE C/F TO BALANCE SHEET | | 29,734.65 | | | |
| **TOTAL** | | **129,255.58** | **TOTAL** | | **129,255.58** |

NOTE: THE HEADINGS AS PER THE PRESCRIBED FORM WHICH ARE ABSENT IN THE ABOVE STATEMENT SHOULD BE READ AS `NIL'

SUBJECT TO OUR REPORT OF EVEN DATE

**FOR MARATHE & ASSOCIATES**

Sd/-
CHARTERED ACCOUNTANTS
MEMBERSHIP NO.31107

**FOR MARATHE PRATISHTHAN**

| Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|
| PRESIDENT | SECRETARY | TREASURE |

MUMBAI: DATED NOVEMBER 03, 2009

### सुविचार

आयुष्यातून दु:ख कधीच वजा होत नाही; आपण त्याच्यापेक्षा मोठे होऊन ते सोसण्याची ताकद कमावयाची असते.

*- फिलिपोस*


**खापरपणजी सौ. गौरी शिवराम मराठे**

यांच्या स्मरणार्थ

**सीए प्रभाकर दामोदर मराठे (पृ.१२०)**

वडाळा, मुंबई-४०००३१

सेल : ९८२०२३२०८२ दूरध्वनी : २४१५०८८९

ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com

# गोमन्तक मराठे परिवार संमेलन २००९

**लेखिका सौ.शुभदा दिपक मराठे, पृ.५३३**

गोमन्तक मराठे परिवारातर्फे दरवर्षी कुलबांधवांचे संमेलन घेण्यात येते. यावर्षीचे संमेलन दि. २८ जून रोजी योगेश्वरी मंडप साखळी - कुळण येथे संपन्न झाले.

या छोट्याशा प्रादेशिक संमेलनाला प्रतिष्ठानचे पदाधिकारी उपस्थित राहिले हे विशेष.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. आनंद यशवंत, तसेच श्री. रमाकांत विद्वांस, श्री. वा.ग. मराठे, श्री. सीताराम खांबेटे हे सर्वचजण या संमेलनात सक्रीय सहभागी झाले.

सकाळी सर्वप्रथम मंदिरात कुलबांधवातर्फे श्रीसूक्त आवर्तने करण्यात आली.

पावसाचे दिवस असल्याने सकाळी उपस्थिती अगदीच नगण्य होती. त्यामुळे थोडे उशीरा म्हणजे ठीक ११.०० वाजता संमेलनाला सुरुवात झाली.

स्वागतगीताने (कु. प्रणव प्रदीप) व स्वागत पूष्प प्रदान करून (कू. पूर्वा प्रसाद) संमेलनाची सुरुवात झाली. तसेच संमेलनाचे प्रास्ताविक थोडक्यात श्री. विष्णु पांडुरंग यांनी केले.

आजच्या संमेलनाचे अध्यक्ष श्री. रमाकांतजी विद्वांस यांच्या हस्ते श्री. परशुरामाच्या फोटोला पुष्पहार अर्पण केला गेला. व पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून संमेलनाला सुरुवात झाली.

श्री. आनंद यशवंत यांनी आपल्या छोट्याशा भाषणात गोमन्तक मराठे परिवारासाठी सर्वतोपरी मदत करण्याची आपली तयारी असल्याचे सांगून ते पुढे म्हणाले 'मी बोलतो कमी, काम जास्त करतो.'यातच सर्वकाही आले.

श्री. सीताराम खांबेटे यांनीही आपल्या भाषणात कुलवृत्तांताची नवीन आवृत्ती तयार करण्याच्या कामी आपण व्यस्त असल्याचे सांगितले.

हळूहळू उपस्थितांची संख्या वाढत होती. आत्तापर्यंत पन्नासच्या घरात उपस्थिती पोचली होती.

उद्घाटन सोहळा समारोपप्रसंगी अध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस म्हणाले की, गोमंतकातील संमेलनात उपस्थितांची संख्या मुंबईपेक्षा नक्कीच जास्त आहे.

दूसरे सत्र होते - खुली चर्चा अध्यक्ष होते. श्री. गणेश शंकर.

विषय - १. श्रीदेवी योगेश्वरीच्या मंदिरापाशी भक्तनिवास (एक किंवा दोन खोल्या) मराठे परिवाराकडून अर्पण.

सुरुवातीला या विषयावर अध्यक्षांचे प्रास्ताविक भाषण झाले. व तद्नंतर उपस्थितांची मते विचारण्यात आली.

कांहीच्या मते एक किंवा दोन खोल्या मराठे परिवारातर्फे बांधून चित्पावन संघाला अर्पण कराव्यात.

मा. श्री. आनंद यशवंत यांनी मराठे परिवाराची स्वत:ची वास्तू असावी व त्यासाठी प्रतिष्ठान परिवाराला सर्वतोपरी मदत करील असे आश्वासन दिले. आणि जवळ जवळ सर्वांनीच हा विचार उचलून धरला. त्यात थोडा बदल होत गेला. ही वास्तू मराठे परिवाराने स्वत: जागा घेऊन बांधावी. या विचाराप्रत चर्चा येऊन थडकली. आणि परिवारातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ बांधव श्री. परशुराम दीवाकर (उर्फ नंदादादा) यांनी नियोजित वास्तूसाठी हवी असलेली जागेची व्यवस्था स्वत: करून देतो असे सांगितले.

जागा मिळाली, आता इमारत बांधणे त्यासाठी निधीची आवश्यकता हा कसा जमवावा?

मराठे परिवार सदस्यांकडून वर्गणीच्या स्वरुपात तसेच कोणत्याही अटीविना देणगीस्वरुपात निधी जमवावा असे ठरले.

त्यासाठी समिती नेमणे आवश्यक.

देणगीदार मार्गदर्शक : श्री. परशुराम दीवाकर
समिती अध्यक्ष : श्री. निळकंठ परशुराम

गोमंतकाच्या चारही विभागातून प्रत्येकी एक याप्रमाणे चार सभासद.

१. सत्तरी विभाग : वसंत मराठे
२. डिचोली विभाग : मधूकर दीवाकर
३. फोंडा विभाग : सौ. आनंदी वामन
४. पेडणे विभागासाठी : श्री. गणेश शंकर.

अशापद्धतीने 'गोमन्तक मराठे परिवाराची स्वत:ची वास्तू' या विषयाला उत्स्फूर्त चालना या संमेलनात मिळाली. आणि त्याहून मोठे भाग्य प्रतिष्ठानचे सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन.

गोव्यात एखादे मराठे बंधूंचे लॉज असल्यास इतर भागातून येणाऱ्या कपिगोत्री मराठे बांधवांसाठी सवलतीच्या दरात उपलब्ध व्हावे अशी सूचना श्री. खांबेटे यांनी केली. आणि ही सूचना एकमेव लॉजधारक श्री. निळकंठ परशुराम यांनी चक्क ५० टक्के सवलतीसह उचलून धरली. मुंबईकरांना गोड धक्काच! गेल्या दोन वर्षात या ना त्या कारणाने संमेलनाच्या तारखांत बदल होत होत जानेवारी / फेब्रुवारीत होणारी संमेलने चक्क मे जून पर्यंत लांबत गेली. असे न होता संमेलने वेळेतच व्हावीत. उपस्थितीही चांगली होईल. त्यासाठी दर दोन महिन्यांनी वेगवेगळ्या विभागातील कुलबांधवांच्या घरी बैठका व्हाव्यात व संमेलन मात्र योगेश्वरी मंदीर मंडपातच व्हावे असे सर्वानुमते ठरले.

संमेलनात केवळ रुक्ष विषयावर चर्चा न होता. विविधता असावी जेणेकरून 'तरुणाई'चा सहभाग वाढेल. या विचाराप्रत बांधवांचे एकमत झाले.

आणखी एक विषय होता - सूतक -सोयर माहितीवजा विचार. हा विषय तसा कालबाह्यच तरीसुद्धा देवधर्म आहे तिथे हे असणारच. मात्र त्याचा बाऊ करु नये. घरात सगळे कुळाचार पाळावेत. पण बाहेर त्याचे प्रदर्शन नको. कारण कांही गोष्टींचे संदर्भ इथे जुळत नाहीत. त्यासाठी अधिक खोलात न शिरणे हितकारक. पुढचा विषय होता - योगेश्वरी को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी श्री. निळकंठ परशुराम यांनी क्रेडीट सोसायटीविषयी अधिक माहिती पुरविली. सर्व सदस्यांनी या सोसायटीचे सभासद होऊन कर्ज व इतर स्वरुपात या सोसायटीचा लाभ करून घ्यावा. कर्जाचा विषय येताच 'गोवा बागायतदार सहकारी सोसायटी' चे अध्यक्ष ॲड. सुदीन सदाशिव यांच्याकडून बागायतीसंदर्भात मिळणारे कर्ज व सवलती यांची माहिती करून घेण्यात आली. व ही खुली चर्चा अगदी खेळीमेळीच्या वातावरणात विचारांचे आदान-प्रदान होत संपन्न झाली.

*(पृष्ठ १४ वर)*

# नर्मदा परिक्रमा

**लेखिका - श्रीमती साधना मराठे (पृ.३६९) नाशिक**

एक अध्यात्मिक यात्रा. श्री मार्कंडेय ऋषी यांनी या परिक्रमेची सुरुवात केली. अत्यंत खडतर व श्री नर्मदा माईला मिळणाऱ्या ९९९ उपनद्यांच्या उगमापर्यंत जाऊन त्यादेखील न ओलांडता परत उपनदीच्या उत्तर तटावरून नर्मदा परिक्रमा सूरु करायची अशा रितीने २७ वर्ष कालावधीची ही अध्यात्मिक परिक्रमा त्यांनी पूर्ण केली. नर्मदा नदीचीच परिक्रमा का करायची असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. त्याचे कारण ही सर्वात वयस्कर एकमेव पश्चिम वाहिनी नदी आहे. ती हिमालयापेक्षा देखील वयाने मोठी आहे असे म्हणतात.

अशी ही नर्मदा. स्नेहदा म्हणावी कि प्रेमदा म्हणावी, की मातृदेवो भव म्हणून नमस्कार करावा? अशा भावपूर्णतेने मी १३/१०/२००८ रोजी परिक्रमेस प्रारंभ केला व चार महिन्यांत ही परिक्रमा पूर्ण केली. आईप्रमाणे तिने परिक्रमा कालावधीत माझे पालनपोषण केले. एक अद्‌भुत शक्ती आपल्यामागे असते हा अनुभव पावलोपावली आला. साधूचे जीवन कसे जगतात याची प्रचिती आली व त्यातून परमानंद काय असतो याचा प्रत्यक्ष प्रत्यय आला. थंडी, ऊन, वारा, पाऊस यापासून माईच आपले रक्षण करते. आई आपल्या मुलाला उपाशीपोटी ठेवत नाही याचा अनुभव आला. तसेच तिने घेतलेल्या परिक्षेत उतरले तर परिक्रमा करणारे आपण स्वत: रहात नाही. आपोआप सर्व गरजा गावकऱ्यांच्या रूपाने नर्मदामाता येऊन पूर्ण करते. रस्ता दाखवायला वेळेवर गुराखी, गावकरी किंवा अंतर्मनात प्रवेश करून मैयाच मार्गदर्शन करते.

अनुभव सांगायला पुष्कळ आहेत. पण प्रत्यक्षानुभूती घेणे हाच परिक्रमा दर्शनाचा लाभ आहे. ज्यांना शक्य असेल त्यांनी जरूर लाभ घ्यावा. भावपूर्णतेने सर्व विश्वास माईवर सोपवा, परिक्रमा सुलभ होईल हा माझा स्वत:चा अनुभव आहे.

अशी ही प्रेम देणारी, पोषण करणारी, शक्ती देणारी नर्मदा मैया तिला माझे साष्टांग दंडवत

नर्मदे हर, नर्मदे हर, नर्मदे हर हा पंचाक्षरी मंत्र या यात्रेत परिक्रमा पूर्ण करणास मदत करतो.

नर्मदे हर!!!

**- श्रीमती साधना वसंत मराठे**
(पृ.३६९)
३, वसंत बंगला,
पाटील कॉलनी लेन नं.३.
अेच्.पी.टी. कॉलेज रोड,
नाशिक-४२२००५.
फोन-०२५३-३१-७०१

◆◆◆

*(पृष्ठ १३ वरून)*

## गोमन्तक मराठे परिवार संमेलन २००९

सुग्रास भोजनानंतर जो सुरुवातीला व्हायला हवा होता तो परिचयाचा कार्यक्रम यावेळी घेण्यात आला. (सुरुवातीला उपस्थिती अगदी कमी असल्याने.)

श्री. आनंद यशवंत यांनी छोट्या कल्पेश आनंदचे कौतुक करून त्याला भरघोस बक्षिस दिले. हा १२ वर्षाचा मुलगा संध्या-पूजेसह सर्व सूक्ते पुरुषसूक्त, श्रीसूक्त, अथर्वशीर्ष, रुद्र सौरसूक्त, पवमान, उदकशांत, सप्तशती हे सर्व पाठ म्हणतो. तो इ. ८वीत शिकतो. सर्वात शेवटचा कार्यक्रम - मनोगत उपस्थितांचे.

श्री. आनंद यशवंत यांनी संमेलन अतिशय सुदृढ, सशक्त. प्रत्येकाला मत मांडायला वाव देणारे असे हे संमेलन यशस्वी झाले. असे मत व्यक्त केले सर्वांनीच संमेलन खूप चांगले झाले तसेच चर्चेतील विषय पूर्णत्वाप्रत आल्याचे सांगून हेच संमेलनाचे फलीत ठरल्याचे स्पष्ट केले. सकाळी पुरुषसूक्ताची आवर्तने पासून चहा, नाश्ता, जेवण, चर्चा तसेच सांगते नंतर पुन्हा गरमागरम बटाटेवडे, चहा यांनी सांगता म्हणजे संमेलन यशस्वी झाल्याचा शिक्कामोर्तब.

**सौ. शुभदा दीपक,** (पृ.५३३)
**(शिरोडा-गोवा)**

◉◉◉

**नांदा सौख्यभरे**

सौ. सरलाबाई व श्री. कृष्णाजी श्रीधर मराठे यांचा नातू आणि सौ. कीर्ति श्री. प्रकाश कृ. मराठे यांचा सुपुत्र चि. जयदीप याचा विवाह चि. सौ.कां. सुप्रिया सुरेश खेर हीजबरोबर रविवार दि. १९ जुलै २००९ला सकाळी १०.४७ मि. शुभमुहुर्तावर श्रुती मंगल कार्यालय, पुणे येथे थाटामाटात संपन्न झाला.

वधुवरांना, मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक शुभेच्छा आणि शुभाशिर्वाद.

**हितगुजसाठी साहित्य पाठविताना, 'हितगुज' संपादिका डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०) ८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई - ४०००३१ या पत्त्यावर पाठवावे. तसेच कुलवृत्तांतातील पृष्ठ क्रमांक लिहावा.**

◉◉◉◉◉

पुणे येथील कुलबांधव सौ. नीता व श्री. नरेंद्र केशव खांबेटे यांचे सुपुत्र चि. अजिंक्य यांचा शुभविवाह चि. सौ.का. श्रद्धा प्रकाश बापट हीजबरोबर शुक्रवार दि. ७ ऑगस्ट २००९ला, सकाळी १०वा. ३६ मिनिटांच्या शुभमुर्हूतावर श्रुतिमंगल कार्यालयात, पुणे, येथे संपन्न झाला.

नवविवाहितांना मराठे प्रतिष्ठानद्वारा शुभेच्छा आणि शुभाशिर्वाद.

## सुगरणीचा सल्ला

हिरव्या पालेभाज्या बनवताना सुरवातीलाच कांद्यात मीठ घालून घ्यावे, कांदा पूर्ण परतावा नंतर पालेभाजी घालावी अगदी थोडा वेळ परतावी, पालेभाजीला पाणी सुटत नाही.

अचानक कडधान्य शिजवायचे असेल तेव्हा, कडधान्य धुवून त्यात ४-५ अखख्या सुपाऱ्या टाकून कुकरमध्ये ठेवावे. तीन शिट्या द्याव्यात.

# वसंत नारायण मराठे

***आपले कुलबांधव श्री. वसंत नारायण मराठे ह्यांच्या अमृतमहोत्सवी पंच्याहत्तरी पदार्पणाबद्दल अभिष्ट चिंतन आणि 'जीवेत् शरदः शतम्' शुभेच्छा.***

***- संपादिका***

१९६७मध्ये सर्वप्रथम ठाणे नगरपालिकेत शिवसेनेची सत्ता आली. नगराध्यक्षपदाचा मान वसंत नारायण मराठे या ३४ वर्षांच्या तरुणाला मिळाला. दोन वर्षे नगराध्यक्ष आणि दहा वर्षे नगरसेवकपदाच्या कारकिर्दीत ड्रेनेज सिस्टीमची सुरुवात व दादोजी कोंडदेव मैदानात शुभारंभ करण्याचे श्रेय त्यांना मिळाले. १९७३ मध्ये वसंत मराठे यांनी राजकारणातून निवृत्ती घेतली. हा बदलही त्यांनी प्रबोधनकार व बाळासाहेब यांना सांगून सवरून सन्मानाने केला. या बदलाने त्यांचे जीवन पूर्णपणे बदलून टाकले असे म्हणता येईल. राजकारण सोडणे भल्याभल्यांना जमत नाही. पण गेल्या छत्तीस वर्षांत त्यांनी मागे वळून न पाहता हा बदल पचवून टिकवला हे विशेष. प्रिमीयर ऑटोमोबाईल कंपनीची चांगली नोकरी सोडून मराठे शिवसेनेचे काम करत होते. राजकारण सोडल्यावर उपजीविकेचा प्रश्न उभा राहिला. पण लहानपणी रस्त्यावर बसून रिबिनी व पुस्तके विकण्याचा केलेला उद्योग आणि मराठी तरुणांनी नोकरी न करता उद्योगधंद्यात पडावे ही शिवसेनेची शिकवण त्यांना उपयोगी पडली. ठाणे कारखानदार संघाच्या डिरेक्टरीपासून १९७३ मध्ये त्यांनी सुरू केलेला इंडस्ट्रीज डिरेक्टरीचा व्यवसाय वाढून आज या व्यवसायात ते एकमेवद्वितीय ठरले आहेत. महाराष्ट्र इंडस्ट्रीज डिरेक्टरीचे ते जनकच आहेत. आजवर या डिरेक्टरीच्या १६आवृत्त्या काढण्यात आल्या असून, गुजरात इंडस्ट्रीज डिरेक्टरीची आवृत्ती सहावी आहे. मराठे इन्फोटेक ही ठाण्यातील मराठी उद्योजकाची आघाडीची यशस्वी कंपनी असून, महाराष्ट्र इंडस्ट्रीज डिरेक्टरी, गुजरात इंडस्ट्रीज डिरेक्टरी, महाटेक इंडस्ट्रीयल डिव्हिजन आणि गुगल ॲडवर्डस् प्रोफेशनल हे चार विभाग आहेत. ठाण्याचे मुख्य कार्यालय वगळता अहमदाबाद व पुणे येथे स्वतंत्र कार्यालये असून सर्व मिळून १७० कर्मचारी काम करीत आहेत. जगाला जोडणाऱ्या इंटरनेट क्षेत्रात ही कंपनी अग्रेसर ठरली असून दीड कोटी व्हिजिटर्सकडून तिला भरघोस प्रतिसाद आहे. वसंत मराठे यांनी मेहनतीने नावारुपाला आणलेल्या कंपनीचा विस्तार त्यांचा मुलगा विनय मराठे यांनी करून त्याची कीर्ती देशात व साता समुद्रापलीकडे पसरविण्यात मोठे कौशल्य प्रगट केले आहे. १९७३ पासून त्यांनी ज्ञानेश्वरी, गीता, उपनिषदे, दासबोध, रामकृष्ण परमहंस आदि धर्मग्रंथांचा अभ्यास सुरु केला. पुढे अ.ल. भागवत, चिन्मय मिशनचे अनुभवानंद, बेलसरे, गुरुदेव रानडे, विनोबा भावे आदि थोरामोठ्यांच्या भेटीतून अध्यात्माची खरी ओळख पटली. केवळ भौतिक प्रगती माणसाला सैतान बनवीत असल्याने अध्यात्माची गरज अनिवार्य असल्याचे ते सांगतात. १९९९ पासून गीतेवर प्रवचने देण्याचे काम मराठे करीत असून ७०० श्लोकांची गीता आतापर्यंत तीन वेळा पूर्ण करण्यात त्यांनी यश मिळविले आहे. योगीदास वसंत मराठे यांनी आयुष्याची तिसरी पंचविशी पूर्ण करून चवथ्या पंचविशीत (७६ व्या वर्षात) प्रवेश केला आहे. त्यांना यानिमित्ताने मराठे प्रतिष्ठान तर्फे हार्दिक शुभेच्छा.

**(म.टा. ४.४.२००९ वरून साभार)**

**(वा.ग. मराठे) वर**

***मराठे प्रतिष्ठानच्या संस्थापकाला सलाम।***
***मराठे कुलबांधवांना एकत्रित करणाऱ्या व्यक्तित्त्वाला सलाम।***
***'कृतज्ञ मी, कृतार्थ मी'च्या लेखकुला सलाम।***
***खडतर, कणखर आयुष्य निर्भिडपणे जगणाऱ्या व्यक्तित्त्वाला सलाम।***
***मध्येच डोकावणाऱ्या मिष्कीलतेला सलाम।***
***आता आनंदाने नातीत रमणाऱ्या आजोबांना सलाम।***

**सौ.उर्मिला श्रीनिवास मराठे, पुणे**
(पृ.३८९)

# 'माझी आई'

जीवनगाथा तुझी संपली। विलीन झालीस अनंतातही।
भेटणार न आता आई। आसू येती नेत्री दाटूनी।
उभी मालिका आठवणींची।।१।।
घरकुल आपुले छोटेसेही। नादंत होती तेथे प्रीती।
समाधान अन् होती शांती। कृपाच होती रघुरायाची।
रामभक्तीची होतीस आई।।२।।
तुझी लेकरे आम्ही प्यारी। प्यारे होते भाऊ बहिणी।
सर्वांवरती तुझीच प्रीती। वात्सल्याची तूच मूर्ती।
सर्वांची तू झालीस आई।।३।।
मधेच सुटली साथ बापूंची। परि ना गेलीस खचुनी आई।
जिद्दीची अन् तू धैर्याची। अभिमानाने घरा सावरी।
चंडिकेपरी होतीस आई।।४।।
झिजवुनी देहा चंदनापरी। गंध भरला आमुच्या जीवनी।
झटलीस तू ग सर्वांसाठी। सोसलेस तू संकटा किती।
शक्तीदेवी होतीस आई।।५।।
चैतन्याची अन् स्फूर्तीची। जाण साऱ्या कलागुणांची।
अखंड करूनि नव निर्मिती। सर्वांनाही शिकवण देसी।
उत्साहाची मूर्त आईची।।६।।
नेत्रदान ते जाता करूनि। अंधा लाभे दिव्य दृष्टी।
या दाने तू अमर जाहली। थोर मनाची माय माऊली।
मिळो आसरा प्रभुचरणासी।।७।।

**कवयित्री - श्रीमती सुनीता गोखले**
(पृ.३८९)
(माहेरवाशिण अुषा गोपाळ मराठे)
३५/३७, शिवाजीनगर, पुणे-५
दूरध्वनी - २५५३६८४४
**आईचे नाव - कै.श्रीमती मनोरमा गोपाळ मराठे, वय ९०**

# कावळा

### लेखक - श्री. वामन गणेश मराठे - जोगेश्वरी (पृ.५०३)

काव् - काव् - सकाळची ६.३० ची वेळ. मी झोपेतून जागा झालो. मला माझ्या मित्राची आठवण होते. आपण चहा पितो, त्याला पाणी तरी हवे! लगबगीने त्याचे भांडे साफ करतो. स्वच्छ पाणी ओतून भांडे पुढे करतो. हसऱ्या चेहऱ्याने तो मला न्याहाळतो आणि २/४ घोट पाणी पिऊन निघून जातो. असा हा दिनक्रम आज कित्येक वर्षे चालत आला आहे. थंडी, वारा, पाऊस, उन्हाळा. दिवस कुठलेही असोत त्याचा व माझा दिनक्रम अव्याहत चालूच आहे.

माझ्या सुखदु:खाच्या क्षणातही तो सामिल होऊ लागला असल्याने खाताना, जेवण्यापूर्वी १२.३० ची वेळही कटाक्षाने पाळावीच लागते. माझ्या घरासमोरच त्याचे घर आहे व त्यामुळेच मी हॉलमधे बसलो आहे. तो कोणत्या विचारात मग्न आहे? माझ्यावर कोणते संकट कोसळले आहे. हें ही त्याच्या चाणाक्ष नजरेतून सुटत नाही. कधी कधी तर तो इतरही मित्रांना बोलावतो व सगळेचजण रांगेत उलट सुलट बसून मला जोरजोरात ओरडून धीर देत असतात. आजकाल मी दरवाजा उघडल्यावर लगेचच ओरडून पाणी संपले ते भरून ठेवा ह्याची ओरडून जाणीव करतात. तो म्हणजे कावळा आणि मी! पित्राहुनही मित्र बनून राहिलो आहोत. फक्त तो पक्षी, तो काळा व मी माणूस आणि गोरा प्राणी. एवढेच. गेली ३५ वर्षे कावळ्यांच्या विश्वात मी आहे. फक्त पूर्वी पाणी देत असे. त्यानंतर पाणी, तांदूळ व आतां पोळी, फरसाण, बाकरवजी वगैरे. निरनिराळी फळे मात्र तो केळे बिलकुल खात नाही. कधी कधी मी बाहेरगांवी गेल्यावर चुपचाप आपल्या जागी बसून असतो. मात्र रात्री ते बेरात्री मी आलो तरी तो मला ओ देतो.

मला रात्री व पहाटे ३.३० वाजतां उठावयाची सवय आहे. पण तेव्हांसुद्धा त्याला ओ देण्याची सवय आहे. एवढंच काय तर संध्याकाळी ७ वाजता मी दिवा लावला नाही व एकटाच अंधारात बसलो तर तो 'अंधारात काय बसलास' दिवा लाव असे ओरडतो. ही गोष्ट इथली पण मी गांवाला गेलो आणि सकाळपर्यंत झोपून राहिलो तरी सकाळी जोरजोरात ओरडतो. त्यामुळे मला अंगणात येऊन त्याचे दर्शन घ्यावे लागतेच. मा मात्र तो तिथून जातो. मी त्याचा रंग, त्याची जात, त्याचा आवाज ह्यांत कसलाही भेद करत नाही. कावळा काळा असतो. एवढेच!

अलिकडे कांही कांही ठोकताळेही मला मांडता येऊ लागलेत. अमुक एक गोष्ट करावी की नाही? ह्याबद्दलही त्याचे सिग्नल मला मिळत असतात. संवाद चालत असतात जे आपल्या 'संवादेनं' हीसाधता येत नाहीत असे. कारण संवाद मधे आमच्या पेन्शनरांचेच संवाद असतात. आम्ही मात्र दोघे आमचे संवाद साधत असतो. 'कृतज्ञ मी. कृतार्थ मी' हे पुस्तकसुद्धा असेच संवादातूनच लिहीले गेले आहे. कावळा हाच खरा माझा 'एडिटर' होता आणि अजूनही माझ्या आयुष्यातील बऱ्या वाईट गोष्टींचा साक्षिदार असणार आहे.

कांही माणसे मोराला भावतात. तर कांही पोपट, मैना, घोडा वगैरे. मी कालच शेतकी कॉलेजमध्ये शेळीपालन पाहून आलो. तिथे तर आपले कोकरु कोणते हे प्रत्येक शेळीला शोधून काढता येते व जिला आई नाही त्याला कोणी जवळ करत नाही. गाढवसुद्धा उभा राहून चिंतन करत असतो. आपण मात्र प्रत्येकाची जातवार विभागणी केली. शेवटी प्राणी सगळे एकच नाही का?

मी मैत्री केली ती कावळ्याशी आणि कुंडीतल्या झाडांशी. ह्यावरून एक जाणवते कीं प्रत्येक प्राणी काय किंवा वनस्पती काय? प्रत्येकाला गोंजारावे लागते. त्यांच्याशी गुजगोष्टी कराव्या लागतात. तरच आपली सुखदु:खे ते ऐकून घेतात. आणि भरभरून आपल्याला आशीर्वादही देतात. पण आम्ही माणसे मात्र हेटाळणी, कुत्सीतपणे वागण्यात आणि दुर्लक्षित दृष्टीनेच पाहातो, हे दुर्गुण सोडून, रस्त्यात एखादा ओंगळ वेडा जरी दिसला तरी देवाला नमस्कार न करता त्याला केला तरी तो आपल्यला हासू नक्कीच देईल. रंगावर न जाता गुणावर लक्ष्य द्या! एवढेंच.

**श्री. वा.ग. मराठे** (पृ.५०३)
जोगेश्वरी (पूर्व)
मुंबई- ६०.
दूरध्वनी - २८२६९४०२.

✦✦✦

# वाचकांचा पत्रव्यवहार

मा. संपादिका,
डॉ.सौ. सुमेधा प्र. मराठे,
यांना भा.द. मराठेंचा सादर

२००९चा हितगुज अंक आठ दिवसांपुर्वीच मिळाला. खूप आनंद वाटला.

या अंकातील प्रकर्षाने वाचनीय लेख पुढील प्रमाणे - १. विक्रम ना. सावरकर. २. सौ. विद्या वैशंपायन यांची त्यांचे वडिल श्री. वि.म. मराठे विषयी केलेली कविता फारच वाचनीय आहे. ३. श्री. वि.म. मराठे यांचा 'माझी डोके दुखी' लेख एकदम वेगळा व अनुभवी वाटला. डोकेदुखी एक साधी वाटते पण त्याचा केवढा मोठा शारीरिक परिणाम होतो हा प्रत्यक्ष अनुभव कथन केला धन्यवाद. ४. चक्रदेवांचा तारेवरची कसरत विशेष भावला. आवडला. एकंदरीत आपण या अंका विषयी आधिक जागरुक असता त्यामागे चांगला अभ्यास व तपश्चर्या पण असते तेव्हा तो अंक आकर्षक व वाचनीय होतो. आपणाला विशेष धन्यवाद. असो.

दि. ६.७.०९ रोजी श्री. वि.म. मराठे विश्रामबाग यांचे घरी सांगली मिरज येथील मराठे परिवाराची बैठक झाली मंडळी थोडी होती. पण मराठेंचा प्रयत्न व धडपड खूपच प्रशंसनीय आहे.

सभेमध्ये पुढील गोष्टींचा विचार झाला.

१. हितगुज साठी एक हजार (१०००) रुपये प्रत्येक कुटुंबाने एक मिहन्यात मराठेंकडे जमा करणे व डीडी पाठवणे. २. दर तीन महिन्यांनी मराठे परिवारांतील मंडळींनी एकत्र येणे व चर्चा करणे व कांही विधायक गोष्टी करणेचा प्रयत्न करणे. ३. सभासद अधिक कसे वाढतील यांचे प्रयत्न करणे वगैरे सभासाधारणपणे १ तास झाली. चहापान घेऊन मंडळी मोठ्या आनंदाने व चांगले विचार घेऊन गेली. असो. आभार. घाईगडबडीत लिहीले आहे. वाचणेचा प्रयत्न करणे.

आपला,

**भा.द. मराठे,**
मोरया ब्लॉक ३७.
सह्याद्री नगर, मिरज,

◆◆◆

# थोडं मनातलं.........

**श्री. महेश अनंत मराठे, मुलुंड**

तुला काही जमत नसेल तर हाती पळी भांडे धर कर हे वाक्य / शब्द कानी पडले तेव्हा मी हबकलोच म्हटलं भिक्षुकी करणं इतकं सोपं आहे का? बिन भांडवली व्यवसाय असा जो भिक्षुकी विषयी (गैर) समज झाला आहे तो फारच चुकीचा आहे. द्रव्य स्वरुपात भांडवल नसेल लागत. परंतु पाठांतर, शब्दांचे योग्य उच्चारण म्हणजेच उदात्त, प्लुप, अनुदात्त स्वर हे भाडंवलच नाही का?

हल्ली चांगल्या चांगल्या कंपन्या बंद पडल्या आहेत. काही कंपन्या बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. सरकारी नौक या केव्हाच इतिहास जमा झाल्या आहेत. त्यातच VRS/ CRS चे नवे संकट उभे राहिले आहे. यातून मार्ग काढण्याकरता ब्राह्मण तरुण या व्यवसायाकडे वळू लागले आहेत. चांगली गोष्ट आहे परंतु पाठांतर करण्याकडे कल दिसत नाही कष्ट करीतन ऱ्हीत आचरण शून्य आजच्या ह्या ब्राह्मण तरुणांची पी हळद आणि हो गोरी अशी गत झाली आहे. बरोबरचं आहे म्हणा, हा फास्टफुडचा जमाना आहे ना? इतके थांबायला वेळ कुणाकडे आहे. हे जरी खरे असले तरी ह्या व्यवसायात असे चालत नाही. ब्राह्मण तरुण असा जो उल्लेख केला याचे कारण अजुन तरी हा व्यवसाय ब्राह्मणांनीच करावा असे समाजाचे मत आहे. इतरेतर जनांनी हा व्यवसाय पत्करला तरी समाज कदापि मान्यता देणार नाही.

वर उल्लेख केल्याप्रमाणे हल्ली समाजात बेकारीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे बहुतेकजण नैराश्याच्या गर्तेत सापडले आहेत. यातूनच पुढे मानसिक व्याधींचे शिकार बनतात या मानसिक आजारातून बाहेर पडण्यासाठी देवाचे काहीतरी केले पाहिजे या भावनेतून सत्यनारायण, वास्तुशांत, उदकशांत, नवग्रह शांत हे एका भिक्षुकाला बोलावून त्याच्याकडून करून घेतात.

गुरुजी आपली दक्षिणा किती होईल हा नेहमी विचारला जाणारा प्रश्न याचे उत्तर सोपे आहे. आपल्याला परवडणारी. कालमानानुसार योग्य दक्षिणा याचा अर्थ गुरुजींना दक्षिणा कमी मिळाली याचे दु:ख नको किंवा आपण फारच जास्त दक्षिणा दिली याची रुखरुख यजमानाला लागायला नको. याचे कारण असे की गुरुजी व यजमान दोघांना बाजारभाव सारखाच. गुरुजी बाजारात गेले की त्यांना कोणी कमी भावाने वस्तू देत नाही. गुरुजींना वैद्यकीय परतावा, पीएफ, पेंशन, ग्रुप इन्शुरन्स इत्यादी सुविधांचा लाभ मिळत नसतो. ह्या विषयी एका यजमानाने असा युक्तिवाद केला की कीय हो गुरुजी आपले आजोबा आमच्याकडे येत असत तेव्हा अमुक अमुक दक्षिणा घेत असत आता तुमची दक्षिणा एवढी कशी? आजोबांना लागणारा वेळ त्यासाठी लागणारे मंत्र हे सगळे सारखेच असताना. याला गुरुजींनी उत्तर अत्यंत सोप्या शब्दात यजमानाला समजेल असा मार्मिक उदाहरण देऊन केला. गुरुजी म्हणाले असं बघा ही समोर दिसत असलेली गणपतीची मूर्ती. मूर्तीचा आकार पुर्वी होता तेवढाच आहे. मूर्ती घडवताना लागणारी शाडूची माती पुर्वी घजवताना लागली तेवढींच आता लागली असेल. आपण या गणपतीच्या मूर्तीची पुर्वी देत असलेली किंमत व यावेळी दिलेली किंमत यात तफावत असणार किती ते नाही सांगितलीत तरी चालेल पण याचा विचार जरुर करा की ही तफावत कशामुळे आली? यजमान खजील झाले हे सांगायला नकोच. दुसरे असे की प्रत्येक नोकरदाराला दरवर्षी वेतनवाढ मिळते तशी या व्यवसायात का नको?

गुरुजींनीसुद्धा आपल्या व्यवसायाशी प्रामाणिक असावे लागते. काही धार्मिक कार्यात दशदाने ब्राह्मणाला द्यावित असे सांगितले आहे. उदाहरणार्थ गोदान, भूदान इ. सध्याच्या काळात गाय देणे व्यवहार्य नाही. समजा एका यजमानाने गाय दान केली तर गुरुजींनी ती बांधायची कुठे? हा प्रश्न येईल बहुतेक गुरुजी या दानांऐवजी द्रव्य घेतात. द्रव्य घेण्यास हरकत नाही पण यजमान ह्या दानांबद्दल इतके कमी द्रव्य देतात की त्या द्रव्याने संपूर्ण गाय तर सोडाच पण गायीचे शिंग येईल का? याची शंका यावी तर सांगायचे एवढेच की विविध दानांबद्दल द्रव्य देणे हे सर्वस्वी चूक आहे यजमानाला ही दाने शक्य नसतील तर देऊ नयेत सदर दानाऐवजी द्रव्य देणे ही यजमानांची शुद्ध फसवणूक आहे. भ्रष्टाचार आहे ह्या विवेचनाचे सार एवढेच दक्षिणेचा विचार मन विशाल करून करावा म्हणजे गुरुजी किती लांबून येतात गुरुजींना संकल्पित कार्य करायला किती वेळ लागतो? गुरुजींची कार्य करण्याची पद्धत कशी आहे? गुरुजींचा या विषयातला अनुभव या सर्व बाबी लक्षात घेऊन तारतम्याने करावा लागतो. काही नव्याने या व्यवसायात येणारे तरुण गुरुजी असे विचारतात की आम्ही तोंडाने मंत्र म्हणतो मग पूजा सांगण्याचा व धोतर नेसण्याचा काय संबध? धोतर म्हणजे या व्यवसायाचा गणवेष आहे जसे की हॉस्पिटल मध्ये नर्सेसना, सैन्यात जवानांना, कोर्टात वकीलांना.

नव्याने या व्यवसायात येऊ पहाणारे गुरुजी आपल्या शेजारी नातेवाईकांकडे पूजा सांगायला जातात तेव्हा यजमान असा विचार करतात की या गुरुजींना लहानपणापासून ओळखतो तेव्हा कमी दक्षिणा दिली तरी चालेल किंवा जास्त दक्षिणा दिली तर काय बिघडते? अशी विचारधारा पण बोरबर नाही दक्षिणा सांगायची नसते यजमानांनी दिलेल्या दक्षिणेत गुरुजींनी समाधानी असले पाहीजे. यजमानांनीसुद्धा पित्तशाठ्य करू नये असा पुर्वीचा शाप दंडक होता. त्याकाळी ब्राह्मणांना राजाश्रय होता ती परिस्थिती आता राहिली नाही. हल्ली यजमानांचा दक्षिणा फारच कमी देण्याकडे कल असल्यामुळे गुरुजींना दक्षिणा सांगावीच लागते. लग्न, मुंज असे कार्य घरी असले म्हणजे विद्युत रोषणाई, लाऊड स्पिकर, सनई चौघडा, जेवणावळी यावर वारेमाप खर्च होत असताना गुरुजींची दक्षिणा कमी का? याचे उत्तर सापडणे कठीण आहे. कदाचित वरी गोष्टींवर केलेला खर्चाचा परिणाम दृश्य स्वरुपात व गुरुजींनी म्हटलेल्या मंत्राचा परिणाम अदृश्य स्वरुपात हा तर नसावा असो.

सध्याच्या गुरुजींनी म्हटलेल्या मंत्रांची शक्ती किती? हा संशोधनाचा विषय आहे. मोजकेच अपवाद वगळता गुरुजी संध्या / वेदमंत्रांची आवृत्ती करत नाहीत. शास्त्रात सांगितल्याप्रमाणे वागत नाहीत याला काय म्हणावे? सध्या गुरुजींना हॉटेलचे किंवा अन्य जातींच्या (शूद्र) हातांनी शिजवलेले अन्नखावे लागते ते टाळूनहि चालत नाही. गुरुजींचे आहार विहार उच्चार यावर नियंत्रण नसते क्वचित प्रसंगी धुम्रपान गुटका वगैरे गोष्टींचे सेवन करताना दिसतात. धार्मिक विधींचे जुजबी ज्ञान असताना मोठे यज्ञ याग लग्न मुंज करतात अशा गुरुजींकडून धार्मिक कार्य केले असता फलनिष्पती कशी मिळेल? हा प्रश्न मनात येतो. बरे काही गुरुजी असा युक्तिवाद करतात आम्ही हॉटेलचे खात नाही किंवा इतर यजमानांकडे जेवत नाही पण हा युक्तिवाद किती फोल आहे बघा इतर

यजमानांकडे गुरुजी म्हणून गेल्यावर जेवत नाही पण तेच यजमान मित्रपरिवारांपैकी असतील तर हेच गुरुजी त्यांच्याकडे असलेल्या भोजनावर व्यवस्थित ताव मारणा। यावर श्रावणीला घेतलेले गोमय व इतर दिवशी घेतलेले गोमय यात फरक आहे की नाही असे म्हणून वैचारिक गोंधळ घालायला तयार. किती गुरुजींकडे स्त्री धर्माचे पालन होते? गुरुजींच्या घरी त्यांच्या पत्नीने ठेवलेले घरगडी ब्राह्मण असत नाही. ते इतर असतात अशा घरगड्यांचा घरभर वावर असतो. तो कसा खपवून घेतात? स्वत:चे कपडे धोतर त्याच्याकरवी धुवून कसे पवित्र राहाते? लांबच्या ठिकाणी धार्मिक कार्य असता वाहनात अनेक प्रकारचे/जातीचे स्त्रिया, पुरुष व विटाल स्त्रिया यांचा कळत नकळत स्पर्श होत असतो अशावेळी हे गुरुजी यजमानांकडे आंघोळ तरी करतात का? नुसतेच पदस्नान करतात हे कितपत योग्य आहे? या विषयी संबधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता ते म्हणाले तुमचे म्हणणे बरोबर आहे. परंतू सध्याच्या काळाला अनुसरून नाही. ही शुचिता ज्याचे त्याने व्यक्तिगत पातळीवर ठरवायची असते. जगाला आपण फसवू शकतो पण आपल्या मनाला नाही फसवू शकत.

काही धार्मिक कार्यात आचार्य कार्याला लागणाऱ्या संख्येपूर्तीसाठी आपल्या बरोबर सहाय्यक गुरुजींना घेऊन जातात. सहाय्यक गुरुजींना सांगितलेल्या वेळेत आचार्य येत नाहीत. कार्याला लागणारी योग्य व हेची मांडणी सहाय्यक गुरुजींना येत असेल तर आचार्य येईपर्यंत करून ठेवायला हरकत नाही. आचार्यांनी मांडणी बघुन काही फरक आढळल्यास न बोलता योग्य बदल करून घ्यावा सहाय्यक गुरुजी नवशिके असतील तर मात्र त्यांना ऊगाचचं ताटकळत बसावे लागते. त्यापेक्षा सहाय्यक गुरुजींना त्यांच्या कामाच्या वेळी बोलावले तर उदाहरणआर्थ सहत्रावर्तने/लघुरुद्र असल्यास आचार्यांनी यजमानाच्या घरी अगोदर जाऊन पूर्व पूजा आटोपून ठेवावी तसेच सहाय्यक गुरुजी किती व कोणेत बालवोयचा हे कार्याचे स्वरुप पाहून पूर्ण नियोजन करून ठेवावे. सहाय्यक गुरुजींनी सुद्धा कार्याला उपस्थित राहावे संयुक्तिक कारणाने उपस्थित रहातायेत नसेल तर तशी पूर्वकल्पना आचार्यांना पर्यायी व्यवस्था करण्या इतका अवधी ठेवून द्यावी. कार्याला लागणाऱ्या संख्येपेक्षा एक/दोन गुरुजी जास्त सांगून ठेवावेत तशी पूर्वसूचना यजमानाला द्यावी म्हणजे गुरुजींची संख्या कमी पडली तरी कार्यपूर्ती वेळेत होते. येणाऱ्या सहाय्यक गुरुजींना यजमानाच्या घरी काहीबाही बोलू नये. त्यांचा पाणउतारा करू नये. तुमेच म्हणणे चुकीच्या पद्धतीने होत आहे असे कधीही म्हणून नये. जसे कोर्टात वकीलाला कायद्याचे ज्ञान नाही असे म्हणणे मोठा अपराध आहे तसे अशावेळी शांत बसावे व मग दोन तीन दिवसांनी त्या गुरुजींची चूक त्यांना समजावून द्यावी तरीही त्यांचे म्हणणे पटले नाही तर पुढल्या कार्याच्यावेळी त्या गुरुजींना बोलावू नये. याला अपवाद फक्त ते गुरुजी आचार्यांचे शिष्य असतील तरच.

यजमानांना आपण धार्मिक कार्य का करतो कशासाठी करतो धार्मिक कार्य करून आपल्याला नक्की काय मिळवायचे आहे ह्याबद्दल विचारले असता नेमकेपणाने सांगता येत नाही. (वास्तविक हे सर्व कार्य करतेवेळी संकल्पात आलेलेच असते.) मन:शांतीकरता, आपल्या घरात काहीतरी चांगले व्हावे, मुलांवर चांगले संस्कार व्हावेत, ह्या हेतूने पूर्वापार चालत आलेल्या रुढींमुळे असे गुळमुळीत उत्तर देतात. खरे पाहता, मनापासून देवाला नमस्कार केला तरी देव पूजा झाल्यासारखीच आहे. नव्हे पूजा संपूर्ण होतेच परंतु आपले मन इतरत्र भरकटलेले असते. कितीही म्हटले तरी मनाची अविचलता होणे शक्यच नसते म्हणून आपल्याला मूर्त स्वरुपात देवाशी तदरुपता साधण्यासाठी धार्मिक कार्य करावे लागते. धार्मिक कार्य करताना रांगोळी, सजावट, पूजेची योग्य पद्धतीने केलेली मांडणी हा निव्वळ देखावा आहे. खरा देव हृदयातंच आहे. मनाची ही उन्नत अवस्था येण्याकरता धार्मिक कार्याची जरुरी आहे. परमार्थिक सुख मिळवण्यासाठी चढावयाच्या सोपानाची धार्मिक कार्य ही पहिली पायरी आहे म्हणून धार्मिक कार्य करणे हे आपले कर्तव्य आहे.

धर्माच्या सबंधात गुरुजींना महत्त्वाचे स्थान आहे. यजमान गुरुजींमार्फत धार्मिक कार्ये करून देवाशी संपर्क साधत असतात. यजमानांची गुरुजींवर श्रद्धा असते. ही श्रद्धा जपण्याचे व संवर्धनाचे काम गुरुजींचे आहे म्हणून गुरुजींनी जबाबदारीने वागले पाहिजे. गुरुजींनी प्रथम सदाचार संपन्न असले पाहिजे. प्रत्येक गुरुजी आदरणीय व्यक्ती असलीच पाहिजे. गुरुजींनी आपापले काम व्यवस्थित केले तर सामान्य माणसांचा त्यांच्यावरील विश्वास वाढेल पर्यायाने धर्म वाढीस लागेल. अन्यथा विपरीत परिणाम होऊन धर्माचा ऱ्हास होईल. धर्माच्या रक्षणाची प्राथमिक जबाबदारी गुरुजींवर आहे. धर्म टिकला तर पुरोहित वर्ग टिकेल हे गुरुजींनी अवश्य लक्षात असु द्यावे.

गुरुजींची आचारसंहिता

वेद मंत्र सस्वर म्हणावेत

वेद मंत्राची आवृत्ती यथाशक्ती दररोज करावी.

वेद मंत्रांचा विपरीत अर्थ काढू नये. उदाहरणार्थ उभ्यांउभ्यां अथर्वशीर्ष/रुद यांची आवर्तने सुरू झाली असता -

आपापसात बोलु नये. पुढील कार्याची आखणी करू नये. आपण अनुष्ठानाला बसलो आहोत याचे भान ठेवावे.

लघवी किंवा अन्य कामासाठी उठावे लागणार नाही याची काळजी घ्यावी. अगदीच अशक्य असेल तर सुरू असलेले आवर्तन संपल्यानंतरच आचार्यांची परवानगी घेऊन मधुनच उठून अन्य कार्यासाठी जावे लागल्यास आचार्यांनी त्या प्रमाणात दक्षिणा कापून घेतल्यास कुरुकुरु नये.

काही गुरुजींचा रांगोळी काढण्यात हातखंडा असतो असे गुरुजी हमखास रांगोळी काढताना दिसतात. त्याचा परिणाम इतर गुरुजींचे लक्ष वेधण्यास होतो व सुरू असलेले आवर्तन ऐकण्यात व्यत्यय येतो म्हणून शारिरीक हालचाली व्यतिरिक्त इतर हालचाली बंद कराव्यात.

गुरुजी म्हणतात की आवर्तने ऐकताना कंटाळा येतो म्हणून खाणाखूणा होतात पण हे अनुष्ठान सुरू आहे गप्प बसण्याबद्दल (खरं तर ऐकण्याबद्दल) आपल्याला मोबदला मिळतो हा विचारच त्यांच्या मनात येत नाही.

यजमानांनी सुद्धा सगळे कार्य करण्याची जबाबदारी गुरुजींवर न सोपवता आपलाही सहभाग असावा यासाठी खालील गोष्टी आवर्जुन कराव्यात.

गुरुजी यायच्या अगोदर देव पूजा झालेली असावी.

गुरुजींनी दिलेली वेळ कटाक्षाने पाळावी.

गुरुजींनी सांगितलेल्या दक्षिणा जर जास्त वाटत असेल तर अगोदरच त्याबद्दल स्पष्ट बोलावे. कार्याच्या दिवशी उगाच घासाघीस करू नये.

कार्याला लागणारी सर्व सामानाची सिद्धता करून ठेवावी.

उत्तमातले उत्तम प्रतीचे सामान आणावे.

हळद कुंकू बुक्का अष्टगंध इत्यादी वस्तू वाट्यात काढून ठेवाव्यात. जेणेकरून पाहण्यास सोईचे जाईल.

येणाऱ्या गुरुजींचा कमीतकमी वेळ समानाची जमवाजमव करण्यात जाईल असे पहावे. उदाहरणार्थ श्री सत्यनारायणाची पूजा असली म्हणजे आपले तोंड पूर्व दिशेला (दक्षिण दिशा सोडून) येईल अशा रीतीने चौरंग मांडून त्या खाली रांगोळी घालून सुशोभित करून ठेवावा.

कार्य सुरू असताना फोन / मोबाईल घेऊ नयेत तसेच वरिष्ठ मंडळी आली असता त्यांची विचारपूस करू नये. कारण देवापेक्षा कोणी श्रेष्ठ नाही. घरातील इतर मंडळींनी अशा लोकांची सरबराई अवश्य करावी. फोन/मोबाईल घेऊ नयेत याचे कारण पलिकडील व्यक्तीने मनाला क्लेश देणारी बातमी तर कार्यात आपले मन लागणार नाही. आणखी एक, आपल्याला ज्या गोष्टीत रस असेल. उदाहरणार्थ क्रिकेटची मॅच / टिव्हीवरील मालिका अशा दिवशी / वेळी कार्य करू नये.

भिक्षुकी व्यवसाय म्हणून पत्करणे ही साधी सोपी गोष्ट नाही. पाठांतर हा तर भिक्षुकीचा कणा तोच या व्यवसायात येणाऱ्या या तरुण गुरुजी मोडीतच काढायला निघाले आहेत. पूर्वीच्याकाळी मुद्रण कला नसल्याने पाठांतर करण्याकडे कल असावा असा निरर्थक वाद घालतात. पाठांतराचे अनेक फायदे होतात हे त्यांच्या लक्षात येत नाही. रोजच्या वेद पठणाने पाणी शुद्ध होत बुद्धी तल्लख होते. कार्य लवकर पूर्ण होण्यास मदत होते. यजमानावर एक वेगळीच छाप पडते. एकदा हा व्यवसाय म्हणून पत्करला की नित्य लागणाऱ्या गोष्टी या पाठचं कराव्या लागतात. काही कार्ये वार्षिक असतात त्या विषयाची आवृत्ती जरूर असावी नाहीतर यजमानाकडे त त फ फ करीत पोथी हातात घेऊन कशीबशी उरकली जाऊन आपले चारचौघात हसें होते. फार तर मंत्रांच्या क्रमासाठी मंत्रांची सुरवात हवनाला लागणाऱ्या वस्तू /पदार्थ (समिधा तीळ भात तूप इत्यादी.) अहुत्याच्या संख्येसह असलेले टाचणं स्वरुपात केलेले लिखाण वापरायला हरकत नाही. कार्याच्या आदल्या दिवशी पाठ न झालेल्या मंत्रांची आवृत्ती, मांडणी, कार्याचा संकल्प, गुरुजींनी न्यावयाची सामग्री, कार्याच्या संबधित परिपूर्ण माहिती इत्यादी गोष्टींची तयारी करायला हवी हल्ली यजमान विविध कारणासाठी धार्मिक कार्ये करतात. त्यानुसार संकल्प सांगण्याकरता थोडे संस्कृतचे ज्ञान असायला हवे. नुसते मनेईप्सित सकलमनोकामनासिध्यर्थ असे म्हणणे उचित ठरणार नाही. यजमान गुरुजींच्या प्रत्येक बारीक सारीक हालचालींकडे निरीक्षण करीत असतात. तेव्हा आपले आचार विचार उच्चार उत्तमच असायला हवेत.

स्वर व त्या व्यतिरिक्त केवळ आपण काय म्हणतो आहोत या कडे अनुसंधान न राहिल्याने खालील चूका होतात.

१. कार्याच्या दिवशीचे पंचांगाचा उच्चार.
२. शंख पूजनाच्यावेळी गंधाक्षतपुष्पं म्हणणे.
३. संकल्पात पंचवाक्ये पुण्याहवाचन व न्यासाचा उल्लेख पण प्रत्यक्षात करत नाही.
४. पुण्याहवाचनात शांतीरस्तु, पुष्टिरस्तु तुष्टिरस्तु इ. म्हणताना जेथे प्रीयेताम आहे तेथे प्रीयंतां म्हणणे.
५. उपचाराचे क्रम बदलणे.
६. रुद्र / पवमान इ. सूक्तात संचार.
७. रुद्रात चम च्या ठिकाणी चमे किंवा उलट म्हणणे.
८. प्रत्येक मंत्र विशिष्ट धाटणीत लयीत म्हणावा लागतो तो तसा न म्हणता पौराणिक मंत्रा प्रमाणे / गुरु चरित्रा प्रमाणे म्हणणे.
९. सूर्यास्तानंतर नैवेद्य दाखवताना ऋतंत्वा सत्येन परिषिंचामी असे न म्हणणे.
१०. कधी वेदातला तर कधी पौराणिक मंत्र म्हणणे.

धर्माच्या संबंधात गुरुजींना महत्त्वाचे स्थान आहे. यजमान गुरुजींमार्फत धार्मिक कार्ये करून देवाशी संपर्क साधत असतात. यजमानांची गुरुजींवर श्रद्धा असते. ही श्रद्धा जपण्याचे व संवर्धनाचे काम गुरुजींचे आहे म्हणून गुरुजींनी जबाबदारीने वागले पाहिजे.

**श्री. महेश अनंत मराठे,**
घराणे ७२वें गोमांतक, मुलुंड (पूर्व), मुंबई-८१
फोन नं.२१६३२९४८

◆◆◆

## मानसन्मान

श्री.गजानन भास्कर मराठे यांना अलिकडेच वृत्तपत्रलेखनाच्या क्षेत्रात लक्षणीय कामगिरीबद्दल साहित्य दरवळ मंच, वाशी, नवीमुंबई या संस्थेतर्फे सन्मानपत्र मिळाले. मराठे प्रतिष्ठान द्वारा ग.भा. मराठे यांचे अभिनंदन

◉◉◉◉◉◉

## वाचकांचा पत्रव्यवहार

आपला गेला अंक, त्यातील विविध विषयांवरील लेखांमुळे वाचनीय झाला आहे. काहींचा उल्लेख मुद्दाम करतो. आमच्या आई हा श्रीमती शालिनी मराठे, यांच्या कार्यासंबंधीचा लेख म्हणजे असामान्य कर्तृत्वाचा, बहुढंगी व्यक्तिमत्तावाचा परिचय करून देणारा आहे. विद्यान, साहित्य, अध्यात्म यामध्ये त्यांचे कार्य बघून विस्मय होऊन जातो. सौ.संजिवनी मराठे यांचेपण अभिनंदन. श्रीमती शालिनीताईंना दीर्घायुष्य लाभो या सदिच्छा.

माझी डोकेदु:खी - लेखक वि.म. मराठे यांचा लेख हलका फुलका ''डोकेदु:खी विसरायला लावणारा आहे''. त्यांनी कथित केलेल्या अनुभवात आपण पण कधीकधी गेलेलो असतो.

तारेवरची कसरत, हा तुरुंगामधील अनुभव एका निराळ्या विश्वामध्ये आपल्याला घेऊन जातो. आम्रतरू ही कविता पण स्त्री मनाचे सुंदर चित्रण आहे. आपल्या संपादनाखाली यापुढेही वाटचाल जोरात होईल ही खात्री आहे.

**- श्री.गजानन भास्कर मराठे**
**(पृ.४२७), घाटकोपर**

◉◉◉◉◉◉

मा. संपादक, हितगुज त्रैमासिक.
स. नमस्कार,

जून २००९चा अंक मिळाला. अंकातील सर्व मजकुर, लेख वाचनीय आहेतच तसेच मांडणीही सुबक आहे. दुर्गग्रामच्या ९व्या अखिल भारतीय मराठे संमेलनास अुपस्थित राहण्याची खूप इच्छा होती. परंतु रेल्वेचे आरक्षण न मिळाल्यामुळे व श्री. राजेश रानडे यांनी केलेली व्यवस्था सोईस्कर नसल्यामुळे येता आले नाही. तथापि जून २००९च्या अंकात सविस्तर माहिती वाचून मनाला हुरहुर वाढली.

**श्री. चिं.त्र्यं. मराठे** (पृ.२४८), कळवा
बी/ २०१, नवसरगम को. हौ. सोसायटी.
विक्रम नगर, भुसार आळी, कळवा, ठाणे.
पिन - ४००६०५

## ‘किरात’ चा सन्मान

**श्रीधर मराठे, (पृ.३९६)**

वृत्तपत्र हे माहिती प्रसारण, लोकशिक्षण आणि समाजप्रबोधनाचे साधन मानले जाते; ते चरितार्थाचे साधन क्वचितच होऊ शकते. बडे अुद्योगपती अथवा अुद्योगसमूह यांच्या आश्रयानेच अनेक वृत्तपत्रांचा संसार चाललेला दिसून येतो.

अशा परिस्थितीत वेंगुर्ल्यात अनंत वासुदेव मराठे नावाच्या शिक्षकाने सुरु केलेले ‘किरात’ साप्ताहिक त्यांचा मुलगा केशव आणि त्यांचे नंतर नातू श्रीधर व पणतु ॲड. शशांक यांनी चरितार्थाचा व्यवसाय म्हणून मोठ्या जिद्दीने समर्थपणे चालविले आहे. नुकताच विश्वसंवाद केंद्राद्वारा ‘किरात’ कार श्रीधर केशव यांना पुरस्कार मिळाला ही गोष्ट मराठे परिवाराला निश्चितच अभिमानाची वाटेल - ‘किरात’चे संस्थापक अण्णा मराठे आणि संवर्धक बाबा मराठे यांना मराठे परिवाराच्या वतीने विनम्र अभिवादन आणि ‘किरात’ कार श्रीधर केशव (पृ.३९६) यांचे मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक अभिनंदन.

**- संपादिका**

विश्वसंवाद केंद्र, मुंबई या पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्थेतर्फे दरवर्षी नारद जयंती हा दिवस पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. यावेळी पत्रकारितेच्या क्षेत्रात दीर्घकाळ काम केलेल्या पत्रकारांना पुरस्कार देऊन सन्मानीत केले जाते. गेली दहा वर्षे हा उपक्रम सुरु आहे. यावर्षी ९ मे २००९ रोजी आर्यसमाज सभागृह वाशी, नवी मुंबई येथे प्राचार्य अनिरुद्ध देशपांडे, पुणे यांच्या हस्ते किरातचे संपादक श्रीधर मराठे, यांना शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व अकरा हजार रुपये धनादेश अशा पुरस्काराने गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध बांधकाम व्यावसायीक व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री. सुरेश हावरे यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने समारंभाचे उद्घाटन झाले.

सत्कार मूर्तीतर्फे श्रीधर मराठे यांनी मनोगत व्यक्त केले.

‘किरात’ ने कोकणामध्ये दीर्घकाळ चालविलेली निर्भिड पत्रकारितेची परंपरा, सामाजिक हितासाठी मांडलेले विचार, विविध विकासकामांचा व सामाजिक कार्याचा केलेला पाठपुरावा प्रसिद्धीच्यायोगे विविध सामाजिक शैक्षणिक संस्थांना केलेले सहाय्य ‘किरात’च्या वार्षिक वर्धापनादिनानिमित्ताने घेतलेले विविध उपक्रम, वेळोवेळी ‘किरात’ला मिळालेले पुरस्कार अशा सर्व गोष्टींची नोंद घेऊन विश्वसंवाद केंद्राने यावर्षीच्या पुरस्कारासाठी ‘किरात’चे संपादक या नात्याने श्रीधर मराठे यांची निवड केली आहे. त्याचा उल्लेख या समारंभात करण्यात आला.

कार्यक्रमास नवी मुंबई परिसरातील किरातचे अनेक वाचक, ‘किरात’ला शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते.

◆◆◆

### मराठे प्रतिष्ठान,

**सांगली वृत्त**

प्रतिष्ठान वृत्त दि. ५.७.२००९

मराठे प्रतिष्ठानच्या सांगली मिरज येथील सभासदांची मिटींग विश्रामबाग येथे श्री. वि.म. मराठे यांच्या निवासस्थानी दि. ५ जुलै २००९ रोजी सायंकाळी ५ वाजता बोलाविण्यात आली होती. मिटींग हितगुजच्या सभासदांपुरती बोलाविली होती. सध्या हितगुजचे २७ सभासद आहेत. त्या सर्वांना पत्रे (पोस्ट कार्डे) पाठविली होती. निमंत्रणामधे सभासदांशी ‘हितगुज’ करण्यासाठी एवढेच लिहिले होते. २७ पैकी १२ सभासद हजर होते. मिरजेचे श्री. अरविंदराव गोविंदराव त्यांच्या गुडघ्यावर शस्त्रक्रिया झालेली असल्याने उपस्थित राहू शकले नाहीत. तसे त्यांनी कळविले होते. मिटिंगमध्ये खालिल प्रमाणे चर्चा झाली.

१. सभासद वाढविणे - सध्या सांगलीमधे प्रतिष्ठानचे जे सभासद आहेत त्या शिवाय बरीच मराठे कुटुंबे सांगलीत आहेत असे दिसते. त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना सभासद करून घेण्या विषयी प्रयत्न करणेचे आहेत. त्यासाठी मिरज येथे श्री भास्कर दत्तात्रय मराठे, सांगली येथे चिंतामण गोपाळ व प्रकाश धोंडो मराठे व विश्रामबाग येथे श्री. वि.म. मराठे यांनी प्रयत्न करावेत अशी विभागणी ठरली.

२. सध्या जे सभासद आहेत त्यानंतरची दुसरी पिढी आता बरीच मोठी झालेली आहे तेव्हा आता आपल्या घरातील दुसऱ्या पिढीतील व्यक्तींना सभासद करून घ्यावे असे ठरले. त्यासाठी व हितगुजच्या नवीन वर्गणीदारांसाठी फॉर्मस श्री. वि.म. मराठे पुरवितील.

३. हितगुजची वाढीव वर्गणी देणे बाबत - हितगुजच्या आजीव सभासदांनी वाढीव वर्गणी प्रत्येकी रु. १००० देण्याचे प्रतिष्ठानचे आवाहन सर्वांनी वाचले होते. त्याप्रमाणे सर्वांनी सदर रु.१००० देणेचे मान्य केले. सगळ्यांची रक्कम जुलै ०९ अखेर जमा करायची व नंतर ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात ड्राफ्ट पाठविण्याचे ठरले. श्रीमती संध्या मराठे या बँक ऑफ महाराष्ट्र मधे सेवेत आहेत. त्या ड्राफ्ट काढून देतील. त्यांना कमिशन पडणार नाही.


४. गुणवत्ता पारितोषिक व शैक्षणिक मदत निधी या बद्दल सर्वांना माहिती दिली व आपल्या कुटुंबातील मुला मुलींची नावे पाठविण्यास सांगण्यात आले.

५. नियमित मिटींग घेणे बाबत - आज ज्या प्रमाणे पहिली मिटींग घेतली त्याप्रमाणे वरचेवर एकत्र जमल्यास परस्परांत संपर्क राहील असे मत बऱ्याच जणांनी व्यक्त केले. व प्रत्येकाच्या घरी आळीपाळीने मिटींग घ्यावी असे ठरले. हितगुजच अंक दर तीन महिन्यांनी येतो. तेव्हा अंक आल्यानंतर पुढील महिन्यात नियमित मिटींग घेण्याचे ठरले व त्याप्रमाणे पुढील मिटींग ऑक्टोबर महिन्यात श्री. अशोकराव यांचे घरी होईल असे ठरले. त्यासाठी पत्रे अशोकराव पाठवतील.

जे सभासद यावेळी हजर राहू शकले नाहीत त्यांना या मिटींगची माहिती देण्याचे ठरले. व चहापान होऊन ही पहिली मिटींग संपली.

**श्री. वि.म. मराठे (पृ.२३५)** कार्यकारी अभियंता (निवृत्त)
‘पद्मश्री’ महाराष्ट्र बँकेशेजारी, विश्रामबाग, सांगली - ४१६४१५. फोन.-२३०००७२.

# मानसन्मान



**चि. अमेय जयप्रकाश मराठे (पृ. २४८)**

हा SSC दहावीच्या परीक्षेत ६५० पैकी ५८४ म्हणजे ८९.८५ टक्के गुण मिळवून अुत्तीर्ण झाला. तसेच चि. अमेय हा 'महाराष्ट्र प्रज्ञा शोध' (MTS) परीक्षेत राज्यात सोळावा आला. मराठे प्रतिष्ठानद्वारा चि. अमेयचे हार्दिक अभिनंदन. असेच भरघोस यश मिळत राहो ही शुभेच्छा.

◉◉◉◉◉

**मोहन मराठे यांना जीवनगौरव पुरस्कार (पृ. ३६५)**

साखर तंत्रज्ञांच्या 'शुगर टेक्नॉलॉजिस्ट्स असोसिएशन ऑफ इंडिया' या संघटनेने भारताच्या साखर उद्योगाच्या विकासासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल मोहन सदाशिव मराठे यांना 'लाइफटाइम अचीव्हमेंट ॲवॉर्ड' जाहीर झाला आहे. हा पुरस्कार संस्थेच्या ७०व्या वार्षिक अधिवेशनात उदयपूर येथे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या हस्ते २६ ऑगस्ट रोजी प्रदान केला जाणार आहे.

मराठे हे भारताच्या साखर उद्योग क्षेत्रात तब्बल २२ वर्षे कार्यरत होते. त्यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ व नवी दिल्ली येथील राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघात कार्यकारी संचालक अशा सर्वोच्च पदावर काम केलेले आहे.

◉◉◉◉◉

मुलुंड येथील आपले कुलबांधव श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे (पृ.३३६) यांना वय वर्षे ७१च्या वरील वयोगटात ५० मीटर फ्री स्टाईल पोहोण्याच्या स्पर्धेत पहिले पारितोषिक मिळाले. मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. दत्तात्रेय मराठे यांचे हार्दिक अभिनंदन. ही स्पर्धा कळव्याला येथे दि. १२ जुलै २००९ला आयोजित केली होती. विशेष लक्षणीय गोष्ट म्हणजे या स्पर्धेत श्री. दत्तात्रेय मराठे यांच्या बरोबर ठाण्याचे श्री. दत्ताराम मराठे आणि डोंबिवलीचे श्री. भालचंद्र दत्तात्रेय मराठे हे मराठे प्रतिष्ठानच्या सदस्यांनी भाग घेऊन पोहोण्याच्या शर्यतीत सहभागी झाले. म्हणून त्यांचे ही अभिनंदन. आज ना अुद्या तेही पारितोषिक घेतल्याशिवाय राहाणार नाहीत असा विश्वास आहे. त्यासाठी मराठे प्रतिष्ठानद्वारा शुभेच्छा.

◉◉◉◉◉

**दहावीत अभूतपूर्व यश प्राप्त झालेली कुमारी अश्विनी संजय मराठे हिचे मराठे प्रतिष्ठान तर्फे हार्दिक अभिनंदन**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि अुच्च माध्यमिक मंडळाच्या दहावीच्या परीक्षेत कु. अश्विनी संजय मराठे ही ९७.५३ टक्के गुण मिळवून राज्यात तिसरी आली. कु. अश्विनी ही नागपूरच्या रामदास पेठ, सोमलवार माध्यमिक शाळेची हुशार विद्यार्थीनी आहे. तिने गणित, संस्कृत आणि विज्ञान विषयांत पैकीच्या पैकी गुण मिळविले. आयआयटीमधून इंजिनीअर बनण्याची तिची इच्छा आहे. यशाचे सारे श्रेय ती आई-वडील शिक्षकांना देते.

◉◉◉◉◉

चि. अमेय मोरेश्वर मराठे (रत्नागिरी) हा डिग्री फार्मसी चार वर्षांचा कोर्स अुत्तम प्रकारे फर्स्टक्लास मिळून पास झाला. चि. अमेय डी.फार्म झाल्याबद्दल मराठे प्रतिष्ठानद्वारा त्यांचे हार्दिक अभिनंदन तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

◉◉◉◉◉

श्री. रविन्द्र रा. खांबेटे हे एम्.बी.ए. (मार्केटिंग), पुणे विद्यापीठ ह्या परिक्षेत प्रथमश्रेणी विशेष योग्यता ह्या श्रेणीत अुत्तीर्ण झाले. तसेच त्यांना ७२.७२ टक्के गुण मिळून गुणवत्तायादीत विद्यापीठाच्या टॉपटेन मधेही स्थान मिळाले. मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. रविन्द्र यांचे हार्दिक अभिनंदन.

मराठे प्रतिष्ठान द्वारा श्री. रविन्द्र यांनी गुणवंत विद्यार्थी पारितोषिक नेहमीच मिळविले आहे. त्यांच्या शैक्षणिक प्रवासात मराठे प्रतिष्ठानने त्यांना वेळोवेळी मदत केली आहे. त्यामुळे ते सदा कृतज्ञतेची भावना व्यक्त करतात.

◉◉◉◉◉



**अद्वैत अतुल मराठे यास पुणे** येथे फिनिक्स इव्हेंटस् तर्फे झालेल्या सुगमसंगीत स्पर्धेत उत्तम गायनाचे बक्षीस मिळाले. तसेच म्युझिक असोसिएशन, पुणे या संस्थेतर्फे आयोजीत 'यादे किशोरकुमारकी आवाज आपकी' या किशोरकुमार यांच्या ८०व्या वाढदिवसाचे औचित्य साधून नवोदित गायकांच्या स्पर्धेत अद्वैत यास स्मृतिचिन्ह मिळाले. वरील दोन्ही कार्यक्रमाच्या अंतीम स्पर्धा बालगंधर्व रंगमंदिरात दि. ३ जुलै व ३ ऑगस्ट २००९ रोजी झाल्या होत्या. तसेच रात्रौ १२ वाजता किशोरकुमारचा वाढदिवसाचा केक चि. अद्वैत याच्या हस्ते कापण्याचा मान मिळाला. त्याच्या पुढील यशासाठी मराठे प्रतिष्ठान द्वारा सदिच्छा. चि. अद्वैत हा मुलगा प्रारंभापासून आंधळा असून त्याने अंधत्वावर मात केली आहे.

◉◉◉◉◉



**चि. ऐश्वर्या अजेय मराठे**

हीस १०वीच्या परीक्षेत ८५टक्के गुण मिळून अुत्तम यश मिळाले. तिने अभ्यासाव्यतिरिक्त भरतनाट्यम्, चित्रकला, रांगोळी यातही प्राविण्य मिळविले आहे. MSCIT परीक्षेत ५० पैकी ४८ गुण तिला मिळाले आहेत.

मराठे प्रतिष्ठान द्वारा चि. ऐश्वर्या हीचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

**- संपादिका**

# लडाखची हाक

**अनुभव : श्री.सदानंद मराठे (पृ.४१४), बांद्रा**

**शब्दांकन : सौ.मीना मराठे**

नोव्हेंबर महिना म्हणजे मुंबईतील हिवाळा. शनिवार १५ नोव्हेंबरच्या रात्री शाली व ब्लँकेट घेऊन झोपलो होतो. सकाळी ७ वाजता दाराखालून वर्तमानपत्र आत डोकावले. मी पटकन झडप घालून 'महाराष्ट्र टाईम्स' हाती घेतला.

''जवानांना सलाम .... सीमेवर!'' ह्या मथळ्यावर नजर स्थिरावली.

लगेचच लेख वाचण्यास सुरुवात केली. लेखातील वर्णन रोमांचकारी होते. लेखाच्या शेवटी आव्हानही होते. आम्ही जात आहोत, येणार ना? लेखिका अनुराधा प्रभूदेसाई - विक्रम जोशी. लेख वाचून अंगात स्फुरण चढले. लगेचच अनुराधाताईंशी फोनवर संपर्क साधला व २ ऑगस्ट २००९ रोजी मी तुमच्या बरोबर नक्की येणार असे सांगून टाकले.

झाले ऽऽ, त्यानंतर आमच्या सहप्रवासाच्या हालचाली सुरू झाल्या.

सौ.अनुराधाताईंच्या प्रत्यक्ष भेटीचा योग १५.०१.२००९ला झाला. त्या भेटीत प्रवासात होणारा त्रास व त्या करीता घ्यावयाची काळजी त्यांनी थोडक्यात सांगितली.

त्यानंतर सहा महिने जाण्याच्या तयारीची आखणी करण्यात गेले. मी माझ्या रोजच्या चालण्याच्या व्यायामावर भर देत होतो. सौ.अनुराधाताईंनी सफरीच्या आधी दोनदा विस्तृत स्वरूपात सर्व सूचना व भेटीच्या ठिकाणांची माहिती सर्वांना सांगितली.

एकदाचा ०२.०८.२००९ उगवला व आम्ही सर्व ३८ जण सकाळच्या ११च्या विमानानी मुंबईहून दिल्लीस रवाना झालो. दिल्लीहून बसनी मनालीला पोहचल्यावर १ दिवसाची विश्रांती घेतली.

मनालीहून पहाटे ५ वाजता रोहतंग खिंडीतून सर्चूस प्रयाण केले. प्रवास सतत उंच उंच डोंगरामधून खडतर व अरूंद घाटांमधून विविध नद्यांच्या सोबतीने होत होता.

बारलाच्या खिंड समुद्रसपाटी पासून १६४५० फुटांवर आहे. तेथून जाताना प्राणवायूची कमतरता व थंडीचा तडाखा खूपच जाणवला. आम्हा सर्वांना त्याचा थोडा त्रास झाला. आपले जवान देशाच्या संरक्षणासाठी किती संकटांना तोंड देतात, याची जाणीव झाली. सर्चू सोडल्यावर सर्वांची प्रकृती स्थिर झाली व सर्वजण उत्साही दिसू लागले.

चौथ्या दिवशी संध्याकाळी म्हणजे ०५.०८.२००९ला आम्ही लडाखची राजधानी लेहला पोहचलो. सिंधू नदीच्या तिरावर वसलेले लेह हे शहर फारच सुरेख व स्वच्छ आहे. तेथे दोन मोनॅस्ट्रिज आहेत. तेथे सिंधू नदीचा सुरेख बांधलेला घाट आहे. सिंधू नदीच्या पाण्यात पाय बुडवून बसण्याचा आनंद आम्हाला घेता आला. लेह मधील 'हॉऊस ऑफ फेम' मध्ये लडाखच्या संस्कृतीचे व तेथील लष्कराचे इतिहासाचे जवळून दर्शन झाले. संध्याकाळी 'शांती स्तूपाला' भेट देण्यास गेलो. तेथे एअर मार्शल व लेहच्या कलेक्टरच्या भेटीचा योग आला.

दिनांक ०७.०८.२००९ रोजी पहाटे ५.३० वाजता 'कारगीलच्या' दिशेने निघालो. वाटेत पत्थर साहेब गुरूद्वार, मॅगनेटीक हिल, सिंधू व झंस्कार नदीचा संगम, मूनलँड पाहता आले. मॅगनेटीक हिलच्या चूंबकीय शक्तीमुळे आमची जीप जवळ जवळ १०० फूट खेचली गेली. ते पाहून सर्वजण थक्क झाले. तसेच मूनलँड पाहताना आपण जणू चंद्रावरील भूमीचे दर्शन घेत आहोत असे वाटले. सायंकाळी ५.०० वाजता कारगिल येथे पोहचलो. तेथे अनुराधाताईंच्या हस्ते शहीद जवानांच्या स्मारकावर लष्करी इतमामात पुष्पचक्र वाहण्यात आले. त्यानंतर महिलांनी तेथील अधिकारी व जवानांना राख्या बांधल्या. त्यानंतर लष्करातर्फे आम्हाला चहापान देऊन आमचे आदरातिथ्य केले गेले.

दिनांक ०८.०८.२००९ रोजी आम्ही कारगिलहून ड्रासकडे प्रयाणकेले. हे अंतर सुमारे ६० कि.मी. आहे. तेथे आमच्या स्वागताकरता लष्करातील तीन मेजर जातीने उपस्थित होते. तेथे आम्हाला प्रथम कारगिल युद्धाची चित्रफीत दाखवण्यात आली. नंतर प्रेक्षक कक्षातून टाइगर हिल. बात्रा पॉईंट, ऱ्हिनो हंप, इत्यादी शिखरे दाखवली. त्यानंतर मेजर साहेबानी आम्हाला आपल्या जवानांनी ही शिखरे जिंकण्यासाठी कशी निकराची लढाई दिली व सर्व संकटांना कसे शौर्याने सामोरे गेले याची कहाणी सांगितली. ती ऐकून अंगावर काटातर आलाच व डोळ्यात अश्रू देखील तरळले. त्यानंतर अनुराधाताईंनी जवानांवर केलेल्या कवितेचे वाचन केले. ते ऐकून सर्वजणच हेलावून गेले.

दुपारी १.३० वाजता कारगिलहून या सर्व आठवणी घेऊन लेहकडे निघालो. वाटेत निसर्गाने जणू वेगवेगळ्या डोंगरांवर विविध रंग कुंचला फिरवला आहे असे वाटले, कारण काही डोंगर लाल, काही हिरवे, काही काळे तर काही पिवळ्या मातीची शाल पांघरून उभे होते. असे सर्व उंचच्या उंच डोंगर व खोल खोल दऱ्यांचे दर्शन घेत रात्री ९.३०ला लेह येथे सुखरूप पोहचलो.

दिनांक ०९.०८.२००९ रोजी आमची सात गाड्यांची पलटण नुब्रा व्हॅलीकडे निघाली. वाटेत खर्दुंगला खिंडीत बर्फाच्छादित डोंगर व थंड वाऱ्याचा मारा घेत १७,००० फूटावरून खाली नुब्रा ऑरगॅनीक पार्क मध्ये पोहचलो. तेथे सुरेखशा तंबूमध्ये आमची राहण्याची व्यवस्था केली गेली होती. सभोवताली सफरचंद, जर्दाळुनी लगडलेली झाडे व विविध रंगांची फुले पाहून मन प्रसन्न झाले. नुब्रा व्हॅलीत 'शौक' नदीच्या जवळ असलेल्या वाळवंटामध्ये पाठीवर दोन मदारी असलेले दुर्मिळ उंट पाहण्याचा योग आला. सहलीतील तरूण मंडळींनी उंटांच्या पाठीवर बसून सफर केली. नंतर तेथील इस्पितळातील जवानांना भेटण्यास गेलो. महिलांनी आपल्या सैनिक बांधवांना राख्या बांधल्या व भेटवस्तू दिल्या.

तंबूमध्ये परतल्यावर, आम्हाला असे कळले की दुसऱ्या दिवशी खिंडीतील रस्त्यांचे काम सुरू होणार आहे. त्यामुळे तेथून पहाटे ३.३० वाजता लवकर निघण्याचा निर्णय घेतला गेला. त्यानुसार आम्ही पहाटे ३.३०ला निघून, सकाळी ८.३०ला लेहला पोहचलो.

११.०८.२००९ रोजी आमच्या लडाख वारीचा तांडा पँगाँग लेककडे निघाला.

१७,००० फूटावर असलेल्या 'चांगला खिंडीत' थंड वारे व हिम दर्शनाचा आनंद, जवानांनी दिलेल्या लेमन टी चा आस्वाद घेत घेतला. पँगाँग लेक हा भारत व तिबेटच्या मध्ये विभागला गेला आहे.

पँगाँग लेक जवळ सेवानिवृत्त अधिकारी कॅप्टन वैद्य हे पर्यटकासाठी एक खास भोजनालय चालवितात. आम्हा सर्वांना तेथील चविष्ट भोजनाचा आस्वाद घेता आला.

पँगाँग लेकच्या विस्तीर्णतेचे व निळ्याशार पाण्याचे वर्णन करण्यास माझ्या शब्दकोशातील शब्द अपुरे पडतील. निसर्गाची किमया न्यारी आहे हेच खरे!

वाटेत भेटलेला 'पगला नाला' जो आम्ही जाताना ४ फूट रूंद पात्र भरून वाहत होता, तोच परतताना म्हणजे साधारणपणे दोन तासांनंतर जवळ जवळ २० फूट रूंद दुथडी भरून वाहू लागला होता. त्याच्या खळाळत्या पाण्यातून चालण्याची मजा काही औरच होती.

अदृश्य अशा देवाजीची किमया न्यारीच आहे. अशा प्रकारच्या अनेक विहंगम दृष्यांना छायाचित्रांमध्ये बंदिस्त करीत आम्ही सायंकाळी ५ वाजता 'लेह' येथे सुखरूप पोहोचलो.

दुसऱ्या दिवशी लेह - दिल्ली, दिल्ली - मुंबई विमान प्रवास करून घरी पोहचलो.

घरी पोहोचलो खरा पण मनाने मात्र तिकडच्या निसर्ग सौंदर्यात रममाण झालो होतो. घरच्या सर्वांना प्रवासाचे रसभरीत वर्णन करून झाले.

नंतर एकटा शांत बसून विचार करीत होतो, हे सर्व कोणामुळे सहजशक्य झाले तर अर्थात अनुराधाताईंमुळे! त्यांच्या लष्करी अधिकाऱ्यांशी असलेल्या ओळखी, त्यांचे अनुभव, त्यांची माणसे जोडण्याची हातोटी, खरोखरीच अनुराधाताई हे एक वेगळे रसायन आहे.

पृथ्वीवरील निसर्गसौंदर्याच्या सान्निध्यात नेणाऱ्या त्या देवदूतच आहेत!

**शब्दांकन - सौ.मीना सदानंद मराठे,**
(पृ.४१४)

**- श्री.सदानंद मराठे**
राधानारायण बिल्डींग, ३२वा रस्ता,
दुसरा मजला, प्लॅट नं.१२, बांद्रा (प), मुंबई.
दूरध्वनी : २६४५९५३०
६५७२३०४४

◆◆◆



**ड्रास येथील लष्करातील त्अधिकारी**



**१४००० फूटावरील पँगाँग लेक**

# प्रत्येकाचं स्वप्न, प्रत्येकाचं घर



घरातल्या प्रत्येकाच्या स्वप्नांचा आम्ही विचार करतो.
म्हणूनच आम्ही प्रत्येक गृहरचनेत मोकळेपणा, उत्कृष्ट जीवनशैली आणि आधुनिक सुखसुविधांचा समावेश करतो. हे घर तुम्हांला सहजतेने घेता यावं यासाठी याजवी दरही देतो.
हेच तर आहे निर्माण, तुमच्या स्वप्नांचे आणि सुंदर गृहरचनांचे !

विश्वसनीय परंपरा आणि पारदर्शक व्यवहार

निर्माण ग्रुप
ऑफ कंपनीज्
बिल्डर अँड डेव्हलपर्स

## आमचे आधुनिक जीवनशैलीचे प्रकल्प

मुंबईतील प्रकल्प स्थाने : महालक्ष्मी | जोगेश्वरी | मालाड (आझाद) | कांदिवली (पूर्व) आणि (पश्चिम) | गोवंडी | जोगेश्वरी

मुंबई बाहेरील प्रकल्प स्थाने : नेरळ | गोरेगाव आणि माणगाव | गणपतीपुळे

Project marketed by DREAMZ

हेड ऑफिस : 14, न्यायसागर, चिनॉय कॉलेज जवळ, जुना नागरदास रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - 40006
फोन : 91 9987686847 / 48 / 49 | SMS <DREAMZ> 567678


BOOK POST

**If undelivered, please return to**

**संपादिका : 'हितगुज'**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१


त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.


पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल: (१) sitaram_khambete@yahoo.com (२) maratheparivar@yahoo.co.in ◉ वेबसाईट: www.marathepratishthan.org